

# संत सेनापती

लेखक : पु. पां गोखले

सेनापती बापट जन्म-शताब्दी महोत्सव समिती प्रकाशन

प्रकाशक : ग. प्र. प्रधान
उपाध्यक्ष
सेनापती बापट जन्म-शताब्दी महोत्सव समिती
सेनापती बापट निवास
भवानी शंकर रोड
दादर, मुंबई ४०० ०२८

प्रथमावृत्ती : १९६८
द्वितीयावृत्ती : १९८१

किंमत : दोन रुपये

मुद्रक : मु० वि० काणेकर
अमेय मुद्रणालय
सर्व्हिस इंडस्ट्रियल प्लॉट नं. ४६
तुर्भे बस डेपोसमोर, वाशी
नवी मुंबई ४०० ६१३

नसे गर्व अंगी, सदा वीतरागी ।
क्षमा-शांति भोगी, दया-दक्ष योगी ।।
नसे लोभ ना, क्षोभ ना दैन्यवाणा ।
अशा लक्षणी जाणिजे योगिराणा ।। १ ।।

भये व्यापिले सर्व सृष्टीस आहे ।
भयातीत संत आनंत पाहे ।।
जया पाहता द्वैत काही दिसेना ।
भये मानसी सर्वथाही वसे ना ।। २ ।।

—रामदास

# बघा, बघा हा एकनाथ !

एकनाथ हे संत आहेत, आहे ना माहीत ? पंधराव्या शतकात ते होऊन गेले. ते कवि होते, भक्त होते, लढवय्ये होते. त्यांचा विसाव्या शतकातला अवतार हो, पांडुरंग महादेव बापट. देवगिरीवर शत्रू चालून आला तर त्याला एकनाथांनी सामना दिला; भागवत, भावार्थ रामायण असे तोलामोलाचे ग्रंथ एकनाथांनी लिहिले; म्लेंच्छ अंगावर थुंकला तर शंभर वेळा नाथांनी स्नान केले; गंगेची कावड गाढवाला पाजली; वडिलांच्या श्राद्धासाठी शिजवलेले अन्न भुकेलेल्या शूद्रांना घालून नाथांनी तृप्त केले आणि हे सारे करताना त्यात कोठे "मी"–पणाचे नाव नाही. सेनापती बापट देशाच्या स्वातंत्र्यासाठी अन् देशबांधवांवर होणाऱ्या अन्याया-विरुद्ध लढले; त्यांनी गीताहृदयासारखे ग्रंथही लिहिले; गावोगावच्या साफसफाया केल्या; रंजल्यागांजल्यांसाठी जीव धोक्यात घातला; आणि हे सारे नाथांच्यासारखाच "मी"–पणा विसरून ! पण जास्त कशाला सांगू ? घ्याच की या नव्या एकनाथाचे दर्शन आता !

—पु. पां. गोखले

## १. धन्य काळ हा दिवस ।

अहमदनगर जिल्हा; संत ज्ञानेश्वरांनी पुनीत केलेला; शहाजी राजे भोसले व चांदबिबी यांनी आपल्या पराक्रमांनी गाजविलेला. त्या जिल्ह्यातील पारनेर. नगरपासून पंचवीसच मैल. तेथे महादेव रामचंद्र बापट रजिस्टरखात्यात नोकर. त्यांची घरधनीण सौ. गंगाबाई. त्यांना झाला मुलगा. कार्तिक शुद्ध एकादशीला, "आजि पुरले नवस । धन्य काळ हा दिवस ॥" असे त्या दिवशी सकाळी ७ वाजता त्या घरी झाले. शके १८०२ ची ही गोष्ट. १२ नोव्हेंबर १८८० हो! गुरुवारचा दिवस. गणपती कुलदैवत असलेले बापट-घराणे. तेथे "पांडुरंग आला घरा ।" म्हणून आनंदीआनंदच झाला.

* *

## २. बापट तापट मोठे

महादेवराव बापट खरोखरच नावासारखे "मऊ मेणाहुनी जरी हरिदास । कठीण वज्रास भेदतीसे." शिस्तीचे कडक, कामाला तडक. "वरच्या लाथा झेलित माथा । सवेचि खाली झाडी लाथा ॥" ही गोष्टच नाही. १८९७ साली वरच्या अधिकाऱ्यांशी त्यांचे खटकले! मग उशीर का काय? महादेवरावांनी सरळ नोकरी सोडली अन् बायकोला घेऊन गणेशखिंडीत जाऊन राहिले! पुन्हा पारनेरचे नाव नाही. सौ. गंगामाईही नावासारखी. ती शांतादुर्गा पतिसमवेत रमली. त्यांच्या पांडुरंगाने या मातापितरांच्या गुणांचा वारसा चालविला.

* *

## ३. अप्पाचा झपाटा

गणेशखिंडीतील पाण्याचे टाके. पाण्याने अगदी तुडुंब भरलेले व खोल. पांडुरंग व त्याचे भाऊ यांचे ते आवडते. त्यांचा सुरकांड्यांचा

खेळ सुरूच ! काठ्या सुरकन पाण्यात भिरकावयाच्या, बाहेर काढावगाच्या, ही मजा–मजा बेभान चाले. अन् झाली की मजाच ! पांडुरंगाचा पाय निसरड्या काठावरून झुकला. पांडुरंग शेवाळ्यातून पाण्यात ! पोहावयाचे ठाऊकच नव्हते त्याला त्या वेळी ! लागला गटंगळ्या खायला.

दोघे भाऊही मग घाबरले. थोरला भाऊ यशवंत. त्याने पांडुरंगाची लांब शेंडी तरंगताना पाहिली. खेचलीन् की त्याने ती ! म्हणूनच पांडुरंग टाक्यातून परत मिळाला. यशवंताला अप्पा म्हणत. अप्पाचा झपाटा बापटांच्या कुळातील साहसाला शोभेसा. "साहसे श्रीः प्रतिवसति !" हेच खरे.

* *

### ४. असा गुरू, असा शिष्य ! !

पांडुरंग ७ व्या वर्षी पारनेरच्या शाळेत "श्री—श्री" शिकू लागला. तो सहा इयत्ता होईपर्यंत पारनेर शाळेतच शिकला. चौथीला वामनराव आवटी हे प्रेमळ मास्तर होते. पांडुरंग हूड व खेळकर. सुरपारंब्या, गोट्या, खो-खो, आट्यापाट्या, नाही तर भटकंती ! पुस्तकी पोपटपंची करायला त्याला फुरसतच कुठे ? आवटी मास्तरांनी पाहिले—पोरगा हुशार, वाया जाता कामा नये.

पांडुरंगाला त्यांनी जवळ घेतले. सांगितले, "तू सहावी पास हो. पुण्याला तुझी इंग्रजी शिकायची सोय मी करीन." आवटी बोलला शब्द खरा करतात, हे पांडुरंगाला ठाऊक होते. केला त्याने अभ्यास चोख; पहिल्या क्रमांकाचा. झाला १८९२ साली सहावी पास, आवटी आनंदले. धाडला त्यांनी पांडुरंगाला पुण्यास इंग्रजी शिकायला, कसे ?

* *

## ५. तपाशिवाय पत नाही

आवटी मास्तरांचा एक शिष्य होता, डॉ. साठे. ते पारनेरचे. त्यांना बीजगणित शिकण्याची हौस. ती आवटींनी पुरवली. शिकवणीची फी ? पांडुरंग बापटाला डॉक्टर साठ्यांनी इंग्रजीची तोंडओळख करून द्यावी; हा सहकार-समन्वय. दोन वर्षांत पांडुरंगाला हावर्डची तीन पुस्तके येऊ लागली. मग आवटींनी पांडुरंगाच्या दादांना गाठले. दादा म्हणजे वडील. पांडुरंगाचे पुढील शिक्षण पुण्यास व्हावे, अशी विनंती केली. पण "बोलाचीच कढी, बोलाचाच भात । जेवूनिया तृप्त कोण झाला ?"

पुण्यास शिक्षण करायला रोकडा पैसा कोठून आणायचा ? तेव्हा सुचली एक युक्ती. सोय जाणील तो सोयरा, "जो एकरूप सुखदुःखपणी गडी तो ।" हा पूर्वसुकृताचा लाभ ! दादा बापटांचे एक मित्र पुण्यात होते. चिंतोपंत देव. शनिवारात टकले हवेलीजवळ रहात. जोशांच्या वाड्यात. त्यांनी पांडुरंगाला ठेवून घ्यायचे कबूल केले. दादा पाच रुपये दरमहा देत. तेवढ्यात खानावळीत अगर वसतिगृहात कोठली सोय व्हायला ? देवांच्या रूपाने पांडुरंगाच्या शिक्षणाला चिंतामणीच भेटला.

* *

## ६. पेटी भरून पदके व बक्षिसे

पुण्यास न्यू इंग्लिश स्कूलमध्ये पांडुरंग जाऊ लागला, चिपळूणकर–टिळक–आगरकरांनी काढलेली ती शाळा. महादेव शिवराम गोळे हे त्या वेळी शाळेचे प्रमुख. धोंडोपंत कर्वे, गोविंदराव भाटे, चिं. गं. भानू, वासुदेवराव पटवर्धन, सीतारामपंत देवधर, नानासाहेब पानसे, बापू लिमये असे पट्टीचे शिक्षक होते त्या शाळेत. मल्लविद्याविशारद गणपतराव

वझे संस्कृत शिकवीत असत पांडुरंगाच्या वर्गाला. कवायत शिकवीत शिस्तीचे दीक्षित. दसऱ्याला ते विद्यार्थ्यांची मिरवणूक नेत. गणवेशात असे ती. गोपाळ कृष्ण गोखले मिरवणुकीनंतर प्रबोधन करीत.

या सर्वांच्या नजरेत पांडुरंग भरला. वर्गात पहिला, खेळकर, खोडकर, चेष्टेखोर आणि आनंद व अभिमान यांचे स्थान असाच पांडुरंग पुण्यासही ठरला. बक्षिसे, शाबासक्या—विद्येतल्या, खेळातल्या सगळ्या पांडुरंगाच्याच. पांडुरंगाची पदके व बक्षिसे यांनी एक सबंध पेटी भरून गेली. ती पुढे एका लफंग्याने लंपासही केली प्लेगच्या कहरात!! पांडुरंगाची पूजा अन् बडव्यांचा भाव!!

* *

## ७. पांडुरंग कोठे आहे?

दारूवाल्यांचा पूल. हिंदु-मुसलमानांची लठ्ठालठ्ठी तेथे १८९५ साली निकराने झाली. पंधरा वर्षांचा पांडुरंग तिथे घुसला होता. दंगा थांबवत होता. ऐकतो कोण? त्या धामधुमीत तात्यासाहेब नातूंनी व भटजी भिड्यांनी हिंदूंच्या बाजूने शर्थ केली नि दंगा थांबला. पण पांडुरंगाला सबंध रात्र रास्त्यांच्या वाड्याजवळच एका घरात जागत रहावे लागले! चिंतोपंत देवांच्या घरी चिंता होती की दंगलीत पांडुरंग 'देवाघरी'तर गेला नाही?

दुसऱ्या दिवशी सकाळी पांडुरंगाचे दर्शन झाले. चिंता गेली. पण पांडुरंगाचे चिंतन निराळेच चालले! लोकमान्य टिळकांचे मित्र तात्यासाहेब नातू आणि चाफेकरांच्या गोफण्या मारुती-क्लबातील पेहेलवान भिडे भटजी! यांनी दंगा मोडला "युक्तीला पाहिजे शक्ती" हेच पांडुरंगाचे चिंतन!!!

* *

## ८. पांडुरंगाला पंढरी पारखी झाली

प्लेग ! १८९७ साल ते. पुण्याचा कलेक्टर रँड याने प्लेगमध्ये पुण्याचा उभा छळ मांडला होता. तेव्हा देवांनी पांडुरंगाला पारनेराला पाठवून दिले. पिल्ल आईबापांच्या पंखाखाली रहावे, हा हेतू. चिंतोपंत देव असे जबाबदारीने वागत होते, तरी "मृत्यु न म्हणे हा करामती। कैवाड (नाना प्रकार) जाणे ॥ १ ॥ मृत्यु न म्हणे हा धूर्त । मृत्यु न म्हणे हा बहुश्रुत । मृत्यु न म्हणे हा पंडित ! महा भला ॥ २ ॥" प्लेगचा जबडा पसरून बसला होता. पुण्यात मृत्यू !! त्याने चिंतामणराव देव आणि त्यांच्या आई, यांनाच "देवाघरी" घालविले. त्यामुळे पांडुरंगाला शिक्षणाची पंढरी पारखी झाली !!

* *

## ९ कलंक मतिचा झडो !

पारनेर ! पांडुरंगाची मॅट्रिक कशी व्हावयाची ? पुण्यातच पांडुरंगाची पुस्तकाशी फारकत प्लेगने करून ठेवली होती. साहजिकच पारनेरात हवाळांनी अन् उनाडांनी पाडुरंगाला घेरले. खाऊ नये ते खाणारी ती मंडळी होती. त्या काळी शिकलेले लोक साहेबांप्रमाणे खाण्यापिण्यात मजाच नव्हे, तर प्रतिष्ठा मानीत ! पांडुरंग बाटलीबाईच्या जाळ्यात सापडणार ?

एकदा एकटाच पांडुरंग घरी होता. तेव्हा विचार आला—आपण दोन वर्षांत काय करतोय ? चक्क प्रकाश पडला. निसटला पांडुरंग जाळ्यातून ! "कुसंगतीत पडलो, कुभाव उठले मनी । कुभावा कुफळे आली, गेली सद्भाव बोधुनी ॥ १ ॥ पुस्तके जवळी केली, दूर केली कुसंगती । केली सद्भाव—अभ्यासे, विशुद्ध मळली मती ॥ २ ॥

* *

## १०. लक्ष्मी—सरस्वती प्रसन्न।

दादांनी पांडुरंगाला चतुर्भुज करावयाचे ठरविले. कोपरगावचे भावे आपली मुलगी देणार होते. पांडुरंगाने त्यांनाच स्पष्ट पत्र लिहिले—"आपणास कर्तव्य नाही!" मुलीचा बाप तो! पत्र पाहताच धावला पारनेरला. दादांना भेटला. गुफ्तगूं झाले. पांडुरंगाची आराधना लगेच सुरू! प्रसन्न झाला पांडुरंग तेव्हा १८९८ साली यमूताई भावे सौ. रुक्मिणीबाई बापट झाल्या.

मग गेला पांडुरंग नगरला आपल्या बहिणीकडे रहावयास. पेंडसे यांच्या घरी राहून मॅट्रिक झाला नगरच्या हायस्कुलातून, पांडुरंग शंकरशेठ स्कॉलर आला. सरस्वती अशी प्रसन्न झाली. वर्षापूर्वी घरी आलेली लक्ष्मी अशी पायगुणाची ठरली.

* *

## ११. डेक्कन कॉलेजात शपथ!

पांडुरंगाचे नाव पुण्याच्या डेक्कन कॉलेजात घातले; ती ३ जानेवारी १९०० ही तारीख होती. पेशव्यांच्या पर्वती रमण्यातील दक्षिणेचा उपयोग करून हे कॉलेज इंग्रजानी काढले होते. ते होते खंडोबाच्या माळावर; पुण्यापासून दोन मैल. त्या माळावरच खडकीची लढाई होऊन रावबाजीवर इंग्रजानी विजय मिळवला नव्हता का?

पांडुरंगाने कॉलेजातील एका चिंचोळ्या खोलीत वसईच्या तहाची शंभरी साजरी केली. पांडुरंगाच्या समोर चापेकरांच्या गोफण्या मारुती-क्लबचे दामोदर बळवंत ऊर्फ भटजी भिडे बसले होते. दोघांच्या मध्ये एक नंगी धारदार तलवार होती. तिच्यावर हात मारून पांडुरंग शपथ घेत होता. भिडेभटजी शपथ देत होते. माधवराव रणदिवे व अण्णासाहेब दास्ताने साक्षी होते.

"अयि मातृभूमि तेरे चरणोंमें जी झुकावूं ।
मै भक्ति भेट अपनी तेरे चरणमें लावूं ॥
तेरेहि काम आवूं, तेराहि मंत्र गाऊ ।
मन और देह तुझपर, बलिदान मैं चलावूं ॥"

वसईच्या तहामुळे स्थिर झालेल्या इंग्रजी साम्राज्यशाहीची शंभरी भरवण्याची ती शपथ होती. पंचायशीच वर्षांपूर्वी इंग्रजाने जेथे विजय मिळवला, तेथेच इंग्रजी सत्ता उडविण्याची ती शपथ! इतिहासातील हे अद्भुत आणि रम्य हँ!!

* *

## १२. पांडुरंग "पदवी पावला"

पांडुरंग पहिल्यापासूनच अभ्यासात चमकत होता. सेल्बी, बेन या प्राध्यापकांच्या शिकवणीवर पांडुरंग खूषच खूष! तेही पांडुरंगाचे कौतुक करीत. शिस्त, वक्तशीरपणा शिकावा तर सेल्बींचा, असे पांडुरंग म्हणे. बी. ए. ला पांडुरंगाने तर्कशास्त्र व नीतिशास्त्र नि तत्त्वज्ञान घेतले. सेल्बींचा तो हातखंडा विषय. बेन यांचे राजकारण व अर्थशास्त्र. ते विषय शिकवताना हिंदुस्थानने स्वराज्य मिळवलेच पाहिजे, असे बेनसाहेब विद्यार्थ्यांवर ठसवीत. त्यांच्या स्तुतिपर पांडुरंगाने संस्कृत कविता लिहिल्या; त्या डेक्कन कॉलेज-क्वार्टर्लीत प्रसिद्धही झाल्या. अशा "परस्परं भावयन्तः" गुरुशिष्यांना "श्रेयः परम्" मिळालेच. १९०३ साली पांडुरंग दुसऱ्या वर्गात बी. ए. पास झाला. आता एम. ए. व्हावयाचे हे ठरलेच!

* *

## १३. टोपीचे भूत अन् भुतकरांची टोपी

डेक्कन कॉलेजच्या वसतिगृहात पांडुरंग पदवीपुढच्या "पारंगत" परीक्षेचा अभ्यास करीत होता. वसतिगृहाचे पर्यवेक्षक होते भुतकर. कडक शिस्तीचा अधिकारी तो! पांडुरंगही वक्तशीरपणेच शिस्त पाळणारा.

एके रात्री आपल्या एका मित्राकडे पांडुरंग गप्पा छाटीत होता. नऊ वाजले! घंटा झाली. पांडुरंग आपल्या खोलीकडे निघाला. अर्धा जिना उतरतो आहे, तो हजरी घ्यावयास निघालेले भुतकर समोर! पांडुरंग बिनटोपीचा त्यांनी पाहिला. खवळलेच ते. पांडुरंगाला त्यांनी जाब विचारला. पांडुरंग म्हणाला—

"यात काय मोठेसे? बरेच विद्यार्थी हल्ली बोडके हिंडतात, अन् प्राध्यापकही. आपणही कधी कधी तसे करताच की! मी माझ्या मित्राकडे गेलो होतो बोडका, ही गोष्ट खरी. पण सायंकाळी. कामकाजाची वेळ नव्हती ती."

पण भुतकर कुठले ऐकायला? त्यांनी प्राचार्य सेल्बींकडे पांडुरंगाविरुद्ध तक्रार नोंदविली. दुसऱ्या दिवशी पांडुरंगाने आपला मनमोकळा खुलासा लेखीटाकी भुतकरांकडे भय्याहाती पोहचविला. भुतकरांचे डोके त्याने फारच भडकले. त्यांनी तो कागद प्राध्यापक मंडळाच्या बैठकीत चर्चेसाठी मांडला. उलट-सुलट, नरम-गरम चर्चा झाली. आणि? तरी पण पर्यवेक्षकाची प्रतिष्ठा! तेव्हा पांडुरंगाने वसतिगृहातील खोली सोडण्याचा व पंधरा रुपये दंड भरण्याचा हुकूम झाला! टोपीचे भूत पांडुरंगाला असे भोवले. सरळ पांडुरंगाला भुतकरांच्या प्रतिष्ठेने टोपी घातली ती अशी.

पांडुरंगाने तो निर्णय मान्य केला. औषधावाचून खोकला गेला, असे

त्याला वाटले. त्याच्यावर अकारण अन्याय झाला म्हणून मित्र हळहळले. पण कर नाही, त्या पांडुरंगाला डर कसली? "न गणसी मज जातो तुच्छ मानूनि तूते।" म्हणून पांडुरंग डेक्कन कॉलेजातून बाहेर पडला.

* *

## १४. बेत बदलला

पदवीधर पांडुरंगतात्या बापट मथुरेला जाणार होते. शिवगणाचार्य तेथले. त्यांनी "साधारणधर्म" लिहिला होता. त्यांच्याजवळ धर्माचा अभ्यास करण्याचे तात्यांच्या मनात होते. पण "पांडुरंगी जेणे घडे अंतराय। हो का बापमाय त्यजावे ते॥" इतक्या प्रेमाचे मित्र आडवे आले. त्यांनी श्रीपादराव आजरेकरांना तारेने पुण्यास आणवले. मित्रवर्य श्रीधरपंत मराठे आजरेकरांदेखत म्हणाले—"तात्या, वेड लागले का तुला? जीवन हा झगडा आहे. आखाडा सोडून जाणार तू? अनुकूल काळाची वाट काही वेळा पहावी लागते. अरे, 'षण्मासिचा वायदा'च ना? चल, मी तुझी सरदार मुतालिकांकडे सोय करतो. अरे, वासुदेव (नानासाहेब) तुला ठेवून घेतोय पहा!"

मराठ्यांचे बोल खरे ठरले. तात्या बापट मुतालिकांकडे सहा महिने राहिले, अन् डेक्कन कॉलेजात पुन्हा दाखलही झाले.

* *

## १५. कायदेभंगातून कायदेदुरुस्ती

मुळामुठी नद्यांची छोटीशी खाडी. क्रीक या नावाने तिची ओळख. झाडांची दाट छाया; झाडांचे प्रतिबिंब पाण्यात; निर्वेध एकांत. मग काय विचारता क्रीकमधील नौकाविहाराची मौज? एकदा तात्या बापट आणि कंपनी तेथे रमली. गप्पासप्पांतून टूम निघाली. नाव खाडीच्या

काठी लावायची अन् जमिनीवर बैठक मांडायची! नियमांच्या विरुद्ध होते ते. भान कुणाला? एकदा सगळ्या मनांची हुल्लड उठल्यावर विवेक कुठला? उबळच प्रभावी ठरल्यासारखे झाले.

नाविकदलाचा प्रमुख सरकारचा हेर होता. त्याने तात्यांना, कायदा का मोडला? म्हणून विचारले. झाली तशी सरळ हकीकत तात्यांनी सांगितली. तात्या खरे बोलले. पण कायदेभंग झालाच. "न कळता पद अग्निवरी पडे। न करि दाह असे न कधी घडे॥" त्यातून हा कायदेभंग साखसुरत ठरवून-सवरून झालेला. सहजच तात्यांना दोन दिवस जिमखाना बंद!!!

सोसली शिक्षा तात्यांनी. पण सरळपणाची गळचेपी अन् गुणांचा कोंडमारा होता झालेला. त्याने तात्यांना चैन नव्हते. झोप उडाली. क्रीडामंडळ अन् नियम विद्यार्थ्यांसाठी की विद्यार्थी, क्रीडामंडळ नि नियमांसाठी?

तेव्हा नियमच बदलून घेतला पाहिजे. हे घेतले तात्यांच्या डोक्याने. प्रचार केला. अधिकाऱ्यांना क्रीडामंडळाची खास बैठक बोलवावी लागली. तात्यांनी माणुसकीच्या मुद्द्यावर सणसणीत भाषण केले. परिणामी ठणठणीतपणे कायदा बदलला. टोपीपेक्षा डोके, नियमापेक्षा माणुसकी आणि शब्दशरणाईपेक्षा कृती महत्त्वाची ठरून तात्यांचा विजयच विजय झाला.

* *

## १६. साखरेचे खाणार त्याला देव देणार

पदवीदान-समारंभासाठी तात्या मुंबईला गेले. तेथे त्यांचा मित्र (बडोद्याचे आचार्य) पेंडसे भेटला. तो कानात कुजबुजला. "एल्फि-

न्स्टन कॉलेजच्या फलकावर जाहिरात लागली आहे. विलायतेस शिकण्या-साठी जाणाराला सर मंगळदास नथूभाई यांनी काही शिष्यवृत्त्या मुंबई विद्यापीठातर्फे जाहीर केल्या आहेत."

अर्जाची मुदत दोन दिवसांवर होती. आर्यन एज्युकेशन सोसायटीत तात्या नुकतेच शिक्षक म्हणून लागले होते. ती नोकरी सोडायचा प्रसंग होता. पण केला हिय्या तात्यांनी. दिला अर्ज. कुलपती सेल्बी, प्रा. फ्रेझर व महादेव मल्हार जोशी यांची शिफारसपत्रे जोडली. शिफारसपत्रांत साहेबलोकांनी तात्यांच्या बुद्धिवादावर व बंडखोरीवर भर दिलाच होता. तात्यांनी टोपीप्रकरणापासून क्रीकखाडीतील नावेच्या गोष्टीपर्यंत सर्व खुलासा करून आपली बंडखोरी म्हणजे अन्यायाविरुद्ध झगडा कसा होता, ते विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांना पटविले. "सत्यमेव जयते"चा अनुभव आला.

मंगळदास शिष्यवृत्तीवर विलायतेस सर्व भागणे शक्य नव्हते. हिंदू एज्युकेशन फंडातून १३०० रु. लोकमान्य टिळकांनी दिले. " उणे पडू देऊ नये कोणा एकाचे" असे मग सरदार अण्णासाहेब मुतालिकांनीही पाहिले.

* *

## १७. शिष्यवृत्ते नमोस्तु ते ।

एका सीध्या फ्रेंच बोटीतून तात्या बापट आपली साधी राहणी व उच्च विचारसरणी सांभाळून विलायतेस गेले. १९ जुलै १९०४ ला ते निघाले व ५ ऑगस्टला पोहोचले.

एडिंबरोच्या नामांकित कॉलेजात म्हणजे हेरिएट वॉट् कॉलेजात तात्या बापटांनी नाव घातले. मेकॅनिकल इंजिनेर होण्यासाठी प्राचार्य लॉरीकडून ते धडे घेऊ लागले.

परतंत्र भारत व स्वतंत्र इंग्लंड यांतला फरक तात्यांना वर्षभरात जाणवू लागला. डेक्कन कॉलेजात आपण घेतलेली शपथ आठवली. एडिंबरो विश्वविद्यालयाच्या पलटणीतील "क्वीन्स रायफल्स" या लष्करी तुकडीत तात्यांनी प्रवेश मिळविला. वर्षभर मिळेल तेवढे लष्करी शिक्षण कसोशीने घेतले.

एडिंबरोस हेमंत-व्याख्यानमाला चाले. स्वतंत्र मजूरपक्ष ती चालवी. त्या पक्षाचे डिंगवाल तात्या बापटांना म्हणाले—'द्या एक व्याख्यान.' विषय होता "भारतातील ब्रिटिश राजवट" (ब्रिटिश रूल इन् इंडिया) बापटांनी शामजी कृष्णवर्मा या जगप्रसिद्ध क्रांतिकारकाकडून दादाभाई नौरोजी, डिग्बी, रमेशचंद्र, ह्यूम, न्या. रानडे प्रभृतींचे ग्रंथ पैदा केले; ते अभ्यासले. आपले व्याख्यान लिहून काढले, १४ जानेवारी १९०६ रोजी ते प्रत्यक्ष झाले. झाल्यावर ते छापवून वाटले. ते दिलखेचक व्याख्यान भूकंपासारखे हादरे देणारे ठरले. भारतातील कारभारी मंडळींनी बापटाला "खाऊ की गिळू" असे थैमान मांडले. मुंबई विद्यापीठाने बापटाला एक खलिता धाडला. कानउघाडणी केली. बापट बोल्याने का दूध पीत होते? ते म्हणालेच—

"ठीक निश्चय मी केला—शिष्यवृत्ते नमो तुला।" आणि? मुंबई विद्यापीठाला त्यांनी लिहिले—"आपल्या नियमाप्रमाणे माझा नियमित अभ्यास ठीक आहे. त्याचे सहामाही अहवाल धाडलेच आहेत. पुढेही येतील. माझ्या खासगत वेळाचा मी मालक आहे. ते स्वातंत्र्य मी गमावणार नाही." मुंबई विद्यापीठाने बापटांची शिष्यवृत्ती बंद केली.

* *

## १८. आग हातात घेतली !!

शामजी कृष्णवर्मांच्या भारत-मंदिरात लंडन येथे बापट गेले. लंडन पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूटमध्ये नाव दाखल करून बसले. भारत-मंदिरात बापटांना विनायकराव सावरकर भेटले. भारताच्या स्वातंत्र्याशिवाय तेथे मग दुसरी कसली चर्चा? वंगभंग, टिळकांचा स्वदेशी—बहिष्कार—राष्ट्रीय शिक्षण हा कार्यक्रम, लाला लजपतरायांची मंडाले येथील स्थानबंदी !!! हे विषय तापल्या तव्यावरील फोडणीसारखे होते त्या काळीं! लंडनमधील भारतीयांचीही एक सभा झाली. त्या सभेत बापट गरजले, "भारताचे प्रधान कारभारी मोर्ले यानी तीन महिन्यांत लजपतरायांना सोडले नाही तर, साहेबबहाद्दूर आहेत अन् मीही आहे!" कोण ऐकणार बापटांचे? आगीशी खेळ होता तो! "आईस सोडवाया येणार कोण? बोला ॥" असा सवाल होता तो.

बापट पॅरिसला गेले. तेथे मिरझा अब्बास व हेमचंद्र दत्त यांची साथ बापटांनी घेतली. पंजाब, बंगाल, महाराष्ट्र यांचा संगम झाला. त्यांना "डाव टाकिति बुद्धिचे, हाव सात्त्विक साधण्या। राव-रंक एक होती, रिपुचा ठाव खोदण्या ॥" असे तीन रशियन देशभक्त भेटले. त्यांच्या मदतीने एका साबणाच्या कारखान्यात बापट कामाला लागले. बॉम्बची शिकवण तेथे एका म्हाताऱ्याकडून मिळाली. तो तरुणापेक्षा तरुण होता. बॉम्बकृतीची भाषान्तरे मग इंग्रजीत तरी जवळ हवीत, असे मग बापटांना वाटले.

इतक्यात, एडिंबरोला हेरिएट्-वॉट् कॉलेजात "२००७ मधील भारत" या विषयावर बापटांचे भाषण ठरले. त्याचा समारोप करताना बापट म्हणाले—

"कोणी सांगावे ? हिंदी स्वातंत्र्यासाठी आम्हांला बॉम्बही उपयोगात आणावा लागेल!" आणि ? अध्यक्षांच्या मेजावर बापटांनी आपले पिस्तुल धाडकन आपटले.

अध्यक्षांसह सभा हादरली—कोसळलीच म्हणाना! पण डॉ. अन्या खोस या रशियन तरुणीने बापटांचे अभिनंदन केले. तिने आपल्या एम्. बी. बी. एस. च्या सहामाही परीक्षेवर पाणी सोडून बॉम्बकृतीचे इंग्रजी भाषांतर बापटांना करून दिले.

बापटांनी बाबू हेमचंद्र दास व मिरझा अब्बास यांच्याबरोबर बॉम्बच्या कृतीची इंग्रजी पत्रके हिंदुस्थानात पाठविली. आणि काही टपालानेही!

* *

## १९. काँग्रेसने प्रतिसरकार व्हावे!

बापटांनी एक टंकलिखित पुस्तक तयार केले. त्याचे नाव "आमची काँग्रेस काय करणार?" त्याच्या पाचशे प्रती हिंदुस्थानात धाडल्या. स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण या (लोकमान्य) टिळकांच्या चळवळीला त्यात पाठिंबा होता. शिवाय, "कोटिच्या कोटि उड्डाणे, झेपावे उत्तरेकडे!" असेही एक कलम त्यात होते. पराक्रमाला आवाहन होते. काँग्रेसला केव्हा तरी प्रतिसरकार बनावेच लागणार हे भविष्य त्यात होते. मग तिने आता (१९०७–०८) पासूनच त्या खटपटीस लागावे, असा त्या पुस्तकात आग्रह होता. १८५७ चा उठाव हा आरंभ धरून बापट इंग्लंडातील आपले उद्योग करीत होते. इंग्रजांची सत्ता आपण आपल्या हाती घेतल्यावर कसा कारभार करू हे काँग्रेसने लोकसेवा करून दाखवावे, असे बापटांनी काँग्रेसला

सुचविले, तो काळ १८५७ च्या उठावाची पन्नाशी पुरी करणारा काळ होता. १९०७ सालचा तो मे महिना.

* *

## २०. बंडाचा झेंडा उभारा

बापट हिंदुस्थानात १९०८ च्या मार्च २६ ला आले. फ्रेंच बोटीनेच, आपले नाव बदलूनच ! दोन पिस्तुले व बॉम्ब तयार करण्याचे वाङ्मय त्यांनी बरोबर आणले होते. वंगभंगामुळे बंगाल पेटलेले ते वर्ष ! 'पेटू दे देश, पेटू दे देश, येथून तेथून सारा पेटू दे देश' असे म्हणणारे ते साल होते ! म्हणून मुंबईस बोटीवरच्या प्रवाशांची कसून झडती झाली ! अधिकाऱ्यांपुढे सर्व सामान टाकून, बापट हात झाडून रिकामे झाले. अधिकाऱ्यांना ते निर्लेप निर्दोषपणाचे वर्तन वाटले. त्यांनी बापटांना सामान घेऊन जाण्यास परवाना दिला. माधवराव रणदिवे (धुळे) हे बापटांचे डेक्कन कॉलेजातील साथी तेथे पूर्वसंकेतानुरूप आले होते. त्यांनी हमालासारखे बापटांचे सामान लांबवले.

बापटांनी कलकत्ता मेलने मुंबई सोडली. कलकत्त्यास हेमचंद्र दासांच्या घरी बारींद्रकुमार घोष, उल्हासकर दत्त वगैरे मंडळी जमली. त्यांस बापट बोलले की "एखादा दुष्मन केव्हा तरी मारीत बसणे हे राष्ट्रीय दृष्टया हितकर नाही. बॉम्ब, पिस्तुले, हत्यारे यांचा संग्रह, लोकसंपर्क, लोकशिक्षण व लोकसामर्थ्य उभारूनच बंडाचा झेंडा उभारला पाहिजे." पण बंगाली म्हणाले—"काही तरी अजब केल्याशिवाय लोकपाठिंबा कसा मिळवणार ?" बापटानाही मान्य होते की "काही एक उत्कटेवीण कीर्ती कदापी नोहे जाण ॥" पण त्यात सुद्धा "अचूक चुकेना कोठे त्याची राज्ये समस्तही" हे साधायला सोपे का आहे ? त्याला "साक्षेपणी बहु चंचळ । नेमक निष्टंक केवळ ॥" माणसे

लागतात. तसा विचार करून योजना करीत बसण्याच्या पलीकडे बंगालमधील "गुप्त्यांचे उठाव" पुढे गेले होते! तेव्हा "श्रीहरीची इच्छा!" म्हणून बंगालमधून बापटानी आपली वळकटी आवळली!!!

* *

## २१. ध्येय भक्तालागी करू न दे संसार

बापट बंगालमधून निघाले. वाटेत मित्रांस भेटत भेटत घरी दादांच्याकडे गेले. त्यांच्या विचाराने पुण्यास बिऱ्हाड करून बसले. त्या वेळी लोकमान्य मुंबईस 'काळ' कर्ते शिवरामपंत परांजपे यांच्यावरील खटल्यात परांजप्यांना सल्ला–मसलत देण्यासाठी गेले होते; ते पुण्यास परत आलेच नाहीत! 'केसरी' वरील राजद्रोहाच्या खटल्यात ते सहा वर्षे मंडालेसच रवाना झाले. एवढयात वृत्तपत्रांनी बातमी दिली की, "बंगालमधील हत्याकांडाचे सूत्रधार पांडुरंग बापट! नरेंद्र गोस्वामी या माफीच्या साक्षीदाराच्या जबानीत ते उमटले होते." भारतीय संस्कृतीचे धडे जगाला देणारा नरेंद्र दत्त (स्वामी विवेकानंद) जाऊन सहा वर्षे झाली नाहीत, तोच नरेंद्र गोस्वामी आपल्याच देशबांधवांना दगा देण्यासाठीच बंगालमध्ये उपटला अँ!!!

पुण्यास मग पोलिसांची भलतीच उठाठेव सुरू झाली. २५ जून १९०८ रोजी तुळशीबागेजवळ 'ज्ञानप्रकाश' वरून ते कळताच, बापट दोन दिवस घरीच गेले नाहीत. ते आपले मित्र देवभानकर यांच्याकडेच डेक्कन कॉलेजात राहिले होते. पुढे त्यानी गुपचूप पांडवांसारखा अज्ञातवास पतकरला. नगर जिल्ह्यात मावशीच्या घरी तीन दिवस काढून, एका जीवाभावाच्या मित्राच्या मदतीने ते औरंगाबादला दाखल झाले. तेथे दहा महिने एका सज्जन अधिकाऱ्याकडे "आचारी" म्हणून काढले. आचार्यासारखे शहाणपण आचाऱ्याला कुठले! म्हणून काही

संशयी डोळे बापटांकडे लागले! ते लक्षात येताच १९०९ च्या मे महिन्यात टापशी बांधून बापटांनी बडवाणी गाठली!! खानदेशच्या उत्तरेचे ते एक संस्थान! तेथे इंदूरच्या एका कंत्राटदाराकडे बापट राहिले. रुक्मिणी–कृष्णांनी सुदामदेवाची सेवा केली, ती बापटांना त्या कंत्राटदार दांपत्याने दिली. तो सेवासप्ताह साजरा होत असताच, भुसावळच्या स्टेशनावर कोरेगावचे भोसेकर हत्यारे भरलेल्या ट्रंकेसह पकडले गेले! बापट अक्षरशः वनवासी रामच बनून राहिले!!!

इंदूरपासून पाऊणशे मैलांवर बापट मग शेतकरी म्हणून नांदू लागले. महिनाभरात तोही पेशा त्यांना सोडावा लागला. ते बढवाणीला आले. तेथे महिन्याचे दिवस मोजून झाल्यावर बापट "धारा"— नगरीत राहिले ते १९१० च्या फेब्रुवारीपर्यंत. आग्र्याहून सुटलेले शिवाजी महाराज जसे "रामजी" गोसाव्याच्या—महंताच्या साहाय्याने थारेपालट करीत, तसेच बापट स्नेह्यांच्या सल्ला–मसलतीने आगे कूच करीत! कफल्लक स्थितीत ते आता बिलिमोरियात (गुजरातेत) तळ देऊन बसले.

•

तेथे बापटांना जे. आबासाहेब रामचंद्र यांचे निमंत्रण मिळाले. त्यात काही अर्थ नाही असाच अनुभव बापटांना मिळाला. लगेच बापट धारकडे सटकले. तेथे नरपशूंच्या जाळ्यात एक निष्पाप कन्या गावली होती. ती त्यांना सोडवायची होती. त्यासाठी तेथील शाळेतील मॅट्रिकचा विद्यार्थी ते बनले. परीक्षेत ते सर्वप्रथम आले. मग काय, सारे वारे अनुकूल झाले व त्या बालिकेची सुटका सोपीच झाली. उत्तर–गोग्रहणाच्या युद्धप्रसंगी विराटपुत्र उत्तराचे सारथ्य करायला गेलेली बृहन्नडा ऐन रणांगणावर अर्जुन म्हणूनच उतरली; त्यातलाच

हा प्रकार होता. "पीछे न पैर डालू, चाहे महाप्रलय हो ।" या वृत्तीला त्याचे काय ?

* *

## २२. तत्त्वज्ञान खोटे, जाणोनी सांडावे ।

त्याच वेळी बापटांना विवेक टोचू लागला. चांडाळांच्या कचाट्यातील गरीब गाय सुटली; ठीक. पण स्वतःच्याच "घरी" काय चालले ? १८९८ त आपले लग्न झाले. एका तपात आपल्या गृहलक्ष्मीला काही सुख ? तेव्हा बापटांनी पत्नीला लिहिले, 'नष्ट मी, नष्ट मजला जाण. लग्न करी प्रिये ! न होवो यौवनाचा या ताप दुःसह मत्स्त्रिये ॥" "अविवाहित मित्राशी एका त्या समयीच मी लिहिले—'मम पत्नीते वरा, सदय व्हा तुम्ही ॥" असे बापटांनी आपल्या आत्मचरित्रात नमूद केले आहे. मनाला येईल तसे वागण्याची आपल्याला मुभा हवी, तर ती दुसऱ्याला का नको ? बापटांचा हा विशाल दृष्टिकोन ! तो त्यांचा मित्र व पत्नी समजून होती. म्हणूनच त्यांनी—

"समागम मज रामाचा जोडला ।
वियोग हा केला देशधडी ॥ १ ॥
देशधडी केला विवेके वियोग ।
पांडुरंगी योग सर्वकाळ ॥ २ ॥

साधून बापटांचे काही ऐकले नाही.

## २३. निघोनिया जाये विवेक आग्रवा । तो संग त्यागावा

बापटांचे चार वर्षे-सहा महिने अज्ञातवासात गेले. १९११ अखेर जे. आबासाहेब रामचंद्र इंग्रज सरकारने गिरफदार केले. त्या महाराजांचा

एक पित्त्या बापटांचा हितचिंतक. त्याने बापटांना कळवले की, "धारच्या हायस्कुलातून तुम्ही मॅट्रिक झालात; तेथेच काही दिवस निर्वेतन शिक्षकी केलीत; तेथून बढवाणीला शिक्षक झाला आहात व आता तेथे कायम होणार आहा; हे सरकारला कळले आहे." हे पत्र पाहताच बापट तडक इंदूरला! तेथील कुजबूज ऐकून ते उज्जैनला झेपावले. तेथे बापटांना आढळ झाला कीं आपल्याला पकडण्यास साहाय्य करावे, म्हणून सरकारने जे. आबासाहेबांना वाटेल तेवढी मदत देऊ केली आहे. दोन वर्षांची मुदत दिली आहे. लगेच बापट काशीला व तेथून मथुरेला पसार!

* *

## २४. विचारूनि बोले, विवंचूनि चाले

मथुरेहून वृंदावन, वृंदावनावरून काशी व काशींतही विश्वेश्वर ही आश्रयस्थाने बापटांची. दहा महिने काढले त्यांनी काशीत. तेवढ्यात ते टंकलेखन शिकले. काही दिवस गंगाकाठी ललिता घाटावरील मठात गोविंद जगन्नाथ शास्त्री म्हणून राहिले व कौमुदी पढले. एक दिवस बढवाणीहून मित्राचा निरोप आला, की सरकारला बापटांचा पत्ता हवा आहे; न मिळाल्यास साऱ्या मित्रांना त्रास होणार! जे. आबासाहेबांचा दूत "बाळ्या." त्याचे हे चाळे हो!!

विचार करून बापटांनी विश्वेश्वराला निरोप मागितला. इंदूरचे ठेशन गाठले. तो काय? फलाटावरच "बाळ्या"चे दर्शन!! त्याने बापटांना रेसिडेन्सीत नेले; मुंबई-पोलिसांच्या स्वाधीन होण्याची मसलत केली; तेव्हा बापट म्हणाले—"अरे, माझ्या जिवलगांशी विचारविनिमय केला नाही, तर त्यांना दगा दिल्यासारखे नाही का होणार?"

बाळ्याने बापटांना होकार भरला. तीन दिवस कसे-बसे गेले. चौथ्या दिवशी बापट व बाळ्या खोलीत बोलत बसले होते. एक दोस्त

आले. त्या रडतराऊने सारेच जमीनदोस्त केले! तो गळेपडू सूर काढू लागला—"अहो, संपले सारे!!! 'ते' आलेतच की!"

बापटांनी ओळखले. त्या गळेपडूचे "ते" म्हणजे पोलिस! बापट शांतपणे उठले; कपडे चढवून खाली गेले. पेटिगारासाहेब व त्यांचे पोलिस यांनी बापटांना घेरले व इंदूर-ठेशनवर नेऊन व्हिन्सेन्ट यांच्या स्वाधीन केले. व्हिन्सेन्टनी बापटांना मुंबई दाखविली. प्रवासात दोघांच्या अघळपघळ गप्पा-चप्पाही झाल्या.

क्रॉफर्ड मार्केटसमोरील पोलिसठाण्यात बापटांना ठेवले होते. जे. आबासाहेब रामचंद्र महाराज दादरहून रोज भेटायला येत. मन-मोकळ्या गोष्टी होत. पण "गाठ पडली ठकाठका । त्याचे वर्म जाणे तुका ॥" सरकारला पूर्वी मिळालेल्या माहितीत काडीचीही भर पडली नाही!!

"भेट जहाली जशास तशाची ।
तेथे ताकास तूर कशाची? ॥"

* *

## २५. गेले काय? राहिले काय?

व्हिन्सेन्टनी मग बापटांना दिल्ली दूर ठेवली नाही. अखिल भारतीय गुन्हाशोधन खात्याचे प्रमुख क्लीव्हलँडसाहेब. त्यांची तेथे गाठ पडली. बंगाली क्रांतिकारकांचा विषय निघाला. बापट जणू त्या गावचेच नव्हेत! साहेबांचा हा आढळ बापटांनी ढळू दिला नाही. मग व्हिन्सेन्ट म्हणाले, "बापट, आम्ही तुम्हांला सोडतो. आमच्यासाठी तुम्ही काय कराल?"

बापट उत्तरले—"मी जरूर एक प्रचार करीन. वैयक्तिक खून करण्यात अर्थ नाही. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी विवेकपूर्वक संघटना केली पाहिजे. हत्यारे गोळा करा, नाही तर तयार करा, पण राष्ट्रात

ती पेलायची तयारी करूनच योग्य प्रसंगी योग्य पावले टाकली पाहिजेत. 'शक्तिने मिळती राज्ये । युक्तिने कार्य होतसे । शक्ति युक्ती जये ठायी । तेथे भगवंत धावती ॥' रामायणाचा हाच खरा बोध आहे. हा प्रचार आहे का तुम्हाला कबूल?"

साहेब थंडच पडले. मग म्हणाले, "आम्ही बोलावू तेव्हा तुम्ही याल ना?"

"अहो, तुमची अवज्ञा करून फुकटाफाकट तुरुंगात खितपतायला मी वेडा का आहे?" हे बापटांचे उत्तर. मग निघाला जामिनाचा प्रश्न. बापट म्हणाले—"जामिनकीवर मी सही करीन! पण मजसारख्या कफल्लकाकडून तुम्हांला मिळायचे काय?"

तरीही बापट सुटले, त्यांचे कोपरगावचे मेहुणे कृष्णाजीपंत त्यांना आपण होऊन जामीन राहिले. बापटांची दोन पिस्तुले व बॉम्बच्या कृतीचे कागद तेवढे बापटांना अज्ञातवासात सोडून गेले ते कायमचेच!

* *

## २६. जनसेवा ती ईश्वरसेवा

बापट घरी पारनेरला आले. मांगवाड्यात, महारवाड्यात जाऊन ते लोकसेवा करू लागले. त्या लोकांना लिहा-वाचायला शिकवू लागले. स्वच्छ कसे रहावे, हे ते त्यांना सांगू लागले. सर्वांभूती ईश्वर आहे असे पटवू लागले. गावातही बेशिस्त कचराटाक, शौचकूपांची रोगट निगा, गटारांची तुंबी पाहून त्यांचाही फडशा पाडण्यास बापटांनी सुरुवात केली. खापर, खोरे आणि खराटा ही आता जनताजनार्दनाच्या सेवा-पूजेची मांगल्ये बापटांनी बनविली.

"विद्यापीठाचा पदवीधर पांडुरंग बापट! हे दरभंग्याच्या महाराजाचे काम करू लागलेला पाहून, शहाणे नावे ठेवू लागले. त्यांच्या प्रतिष्ठेच्या

कल्पनाच भांबावल्या. बापटांच्या दादांना ते कसेसेच वाटू लागले. ब्राह्मणाचे पोर महारभंग्याचे काम करते म्हणजे काय? अशी त्यांची रुखरुख होती. त्यांनी चिरंजिवांना सरळच सुनावले! तेव्हा बापट कसे उत्तरतात, ठाऊक आहे?

"तुम्ही पूजक देवाचे, देवाचा मीहि पूजक।
सर्वव्यापी देव माझा, त्याची मी झाडि बैठक ॥ १ ॥
तुम्ही बैठक झाडीता सान मंगलमूर्तिची।
आन काही न करी मी, मीही सेवा करी तिची ॥ २ ॥"

परिणाम काय झाला, ठाऊक आहे?

"रुष्ट ते जाहले तुष्ट, स्पष्ट होता मदाशय।
आई, दादा न सामान्य, थोर ते विमलाशय ॥ ३ ॥"

मग दादा म्हणूच लागले की—"माझ्या पांडुरंगाच्या हातून चूकच होणार नाही!" फार काय, पारनेरचे रहिमराजे या वृद्ध इस्लामियाला बापटांची "नीचसेवा" पाहून एवढा गहिवर येऊ लागला की त्यांनी बापटांच्या जनसेवेच्या लावण्या व पोवाडे रचले व गावभर नि गावोगाव म्हणून दाखवले.

* *

## २७. अपमान-शल्य ते विषसमचि जीवना

पारनेरला दोन वर्षे निभावली. मग पांडुतात्या बापट पुण्यास आले. आपल्या समाजस्वच्छतेच्या खराट्याचा सपाटा त्यांनी चालू ठेवलाच! 'चित्रमय जगत्' व नंतर लोकमान्य टिळकांचा 'मराठा' अशा नियत-कालिकांतही तात्या काम करू लागले. काळ झपाट्याने पालटत होता.

कॉंग्रेसचे एक शिष्टमंडळ १९१८ साली विलायतला जायचे ठरले. याचे नेते लोकमान्य. ब्रिटिश सरकारला ते कोठून रुचायला? त्याने कोलंबोहून त्या शिष्टमंडळास परत पाठविले ! !

राष्ट्रपुरुषाचा तो अपमान होता. तात्या बापट तो कसा सहन करणार ! विजापूरला मुंबई-इलाख्याची राजकीय परिषद भरली. तेथे बापटांनी विषय-नियामक समितीत "सत्याग्रही असहकाराचा" ठराव मांडला. विलायतला जाण्याचा लोकमान्याना परवाना देण्याबद्दल सरकारला निर्वाणीचा खलिता पाठवावयाचा; परवाना न मिळाल्यास कैसरीकंदनाच्या रंगरूटभरतीविरुद्ध मोहीम उभारावयाची; स्थानिक स्वराज्यसंस्थांवर परिमित काळपर्यंत बहिष्कार घालावयाचा; अशा रीतीनी परकीय सत्तेच्या कारभाराला खीळ घालावयाचा कार्यक्रम त्या ठरावात होता.

सरकारी जुलूमशाहीच्या निषेधाचे हे तेजाब ! त्या वेळच्या प्रांतिक पुढाऱ्यांना मानवले नाही ! ! बापटांच्या सणसणीत भाषणाचाही बार वाया गेला. सरकारच्या निषेधाचे तत्त्व सर्वांना कबूल होते. पण निषेधाचा कार्यक्रम अव्यवहार्य वाटत होता ! ! तत्त्व कबूल, पण तपशील नाकबूल होऊन बापटांचा ठराव बारगळला ! !

* *

## २८. निश्चयाचे बळ । तुका म्हणे तेचि फळ

विजापूरची राजकीय परिषद आटोपली. लोकमान्यांना विलायतला जायला परवाना मिळाला. सर व्हॅलेंटाईन चिरोलवर त्यांनी फिर्याद केली होती ना? "भारतीय असंतोषाचे जनक" असे टिळकांवर पुस्तक लिहिल्याबद्दल !

कोठून तरी गंगेला घोडे न्हाले. मग तात्या बापट पुण्यास डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकरांच्या ज्ञानकोश-कचेरीची जबाबदारी सांभाळत बसले. ज्ञानकोशाच्या कामासाठी बापट वरचेवर मुंबईस जात. तेथे त्यांना समजले की, शौचसफाई करणाऱ्या भंग्यांना पोटापुरताही पगार मुंबई नगरपालिका देत नाही! "आईसारखे मंगल सेवाकार्य करणारे उपाशी! "जे का रंजले–गांजले। त्यांसी म्हणे जो आपुले!!" त्या साधू बापटांना मग कसे चैन पडणार?

अर्ज-विनंत्यांपासून संप-सत्याग्रहापर्यंत बापटांनी संघटना उभी केली. चमत्कार झाला. भंगी मंडळींना प्रत्येकी सात रुपये दरमहा पगारवाढ झाली.

* *

## २९. वेडपट बापट!

याच वेळी अंदमानाच्या वार्ता जोरात येऊ लागल्या. १९०८ पासून अंदमानात नरकयातना भोगत होते बारींद्रकुमार-सावरकर प्रभृती लोक. राजबंद्यांच्या यातना ऐकून जनतेची तडफड होऊ लागली. "राजा छळि जरि प्रजाजनांला, शरण कुणा जावे?"

"अंदमानच्या राजबंद्यांना मुक्त करा," म्हणून एक अर्ज बापटांनी तयार केला. त्या अर्जावर जनतेचा कौल घेण्यास त्यांनी सुरुवात केली. त्या अर्थाचा एक प्रचार-फलक गळ्यात अडकवूनच तात्या बापट पुण्या-मुंबईत हिंडू लागले. शहाणेच नव्हे तर सीधे लोकही बापटांना "सोंग", "वेडपट बापट" म्हणू लागले! पण बापटांना त्याचे काय? "कोणी निंदा, कोणी वंदा। जनसेवेच्या अमुच्या छंदा॥" असे म्हणून बापटांनी चिकाटी चालवली.

त्या चिकाटीला यश आले. जनतेने लाखो सह्या दिल्या. बापटांना वेडे म्हणणारेच वेडे ठरले, "चेष्टा करावया आले । झाले पूजेत गुंग ते ॥" आणि मग काय? चार वर्षांनी सावरकरबंधू अंदमानाबाहेर—हिंदुस्थानात आले.

* *

## ३०. बापट झाले सेनापती

महाराष्ट्राचा मावळा ! त्याने शिवाजीला स्वराज्य मिळवून दिले. १९०८ साली तो लोकमान्य टिळकांच्या सुटकेसाठी ठाण्याच्या काका नाईकांच्या समवेत बंड करायला उठला होता. त्याची चोपन्न गावे उडवून मुळशीतील दोन दरड्यांमध्ये धरण बांधण्याचा मनसुबा टाटा कंपनीने केला. विसाव्या शतकाच्या विशीनंतर !

हाती-तोंडी गाठ घालून मावळा गडी जगणार. टाटा कंपनीचे खेळे त्याच्या भातखाचरात खुंट्या ठोकू लागले. त्यानेच मावळ्यांच्या जीवाचे पाणी पाणी झाले !

पुण्याचे डॉ. विश्वनाथ दामोदर फाटक यांच्या माडीवर मंडळी जमली. मावळ्यांनी आपली कथा सांगितली. हरिभाऊ फाटक व बाळू-काका कानिटकर यांच्याकडे दुःख-विमोचनाचे काम सोपविण्यात आले. शांततेचे सर्व मार्ग योजावयाचे होते. अर्ज-विनंत्या-दयाभाकणूक सगळे काही झाले. उपयोग नाही काडीचा. दोन-अडीच वर्षे गेली त्यात. मग प्रकरण हातघाईवरच आले. सर्वांना ध्रुव, प्रल्हाद, हरिश्चंद्र, सावित्री यांचे सत्याग्रह आठवले.

महात्मा गांधींचा सल्ला घेण्यात आला. आधुनिक सत्याग्रहाचे ते शंकराचार्य नव्हते का? मुंबईस मग डॉ. साठे यांच्या घरी फाटक—

कानिटकर आले. तेवढ्यात तेथे पांडुरंगतात्या बापट आले, चर्चा झाली. बापट बेचैन झाले. दुसरे दिवशी सकाळी ते मंडळींना म्हणाले— "ज्ञानकोशाचा आज राजिनामा देणार. अन्? दुसरे काय? मुळशीचा सत्याग्रही लढा करणार."

सर्व मंडळींसह बापट पुण्यास आले. सशस्त्र क्रांतिकारक आज निःशस्त्र सत्याग्रही झाला. मुळशीत टाटा कंपनीच्या अन् सरकारच्याही लोकांनी चीड आणण्यासारखे प्रकार केले. कित्ती तरी! पण बापट शांतिब्रह्म! ता. १६ एप्रिल १९२१ च्या रामनवमीला सत्याग्रही झेंडा पुंजीशाहीविरुद्ध उभारला. मावळ्यांत जागरण सुरू झाले. कंपनीला व सरकारला सत्याग्रहाच्या समजी गेल्या होत्याच!

बापट एक तुकडी घेऊन धरणाच्या ठरल्या ठिकाणी जाऊन उभे राहिले. लोकांनी त्यांनाच सेनापती केले होते. कंपनीचे मजूर, गवंडी पाथरवट, मुकादम, सुरुंगवाले, दगडफोड्ये तेथे कामासाठी येऊ लागले. सेनापतींनी डोळ्यांत टिपे आणून काम न करण्याबद्दल त्यांना गळ घातली.

कामगार मऊ झाले. कंपनीचे अधिकारी चिडले. त्यांनी चळवळ चिरडण्यास सुरुवात केली. शिवीगाळ, धक्का-बुक्की आणि उंचावरून अंधणाच्या पाण्याचा मारा सत्याग्रही मंडळींवर झाला. पण मावळे इंचभर हटले नाहीत की त्यांचे सेनापती अन् शिलेदारही हटले नाहीत.

पंधरा दिवस हा असा लढा सतत चालला. कंपनी नरमल्यासारखे दाखवू लागली. तडजोडीची भाषा पुढे आली. आपले म्हणणे तडीला नेऊन मिळवावयाची जोड तीच तडजोड; हे सत्याग्रही सांगत. तेव्हा कंपनीने सहा महिने धरणाचे कामच तहकूब केले!!

तो काळकाढूपणा होता. सेनापतींना ते कळत होते. सामने-वाल्याने हुलकावणीसाठीही पळ काढल्यावर मग, तरी का भांडत

बसायचे ? म्हणून सेनापती गप्प बसले. पण त्यांचे मन अस्वस्थ होते; कान टवकारलेले होते आणि डोळे चांगले उघडे ठेवलेले होते.

* *

## ३१. मरणात खरोखर जग जगते

मावळे धीट बनले. स्वावलंबी झाले. टाटा कंपनीने आगगाडीचे रूळ पसरले; चिंचवड ठेशनवरून; धरणाचा मालमसाला नेण्यासाठी. लोकांनी आपापल्या शेतांतील ते रूळ उखडले अन् दिले भिरकावून ! मग कंपनीने शेरेगावाहून जाणारी वाटच धरली; तिच्यावर राजरोस रूळ अंथरले. लोकांची वाहतूकच अडू लागली. तेथेही सत्याग्रह झाला. पण कंपनी वंगेना. तेव्हा सेनापती झाले पुढे ! !

सेनापतींनी नोटिस दिली. विनायकराव भुस्कुटे, पैसाफंड रानडे, देवराव देशमुख, पौडकर मंडळी यांनी रूळ उखडावेत, कंपनीने ते फिरून घालावेत ! असा झगडा सेनापतींनी चालविला. रुळांच्या काढघालीचा धिंगाणा चार दिवस चालला, मग आला एकेरीवर. सत्याग्रह्यांना लाथा-बुक्क्या, शिवीगाळ, शेणमार, फार काय ? विष्ठाफेकही सोसावी लागली. एकनाथांच्या सहनशीलतेने हे सर्व झाले. शेवटी एक दिवस सेनापती रुळावर आडवे झाले. अन् आडली की गाडी कंपनीची. कंपनीचे लोक कौरवांसारखे धावत आले. "हा सगळ्यांनी मिळोनि मारावा ! " असा अभिमन्यूच जणू त्यांना सेनापती वाटले ! ! त्यांनी सेनापतींची कुतरओढ केली; दिले दूर फेकून काट्याकुट्यांत ! !

दुसऱ्या दिवशी सेनापती आणि त्यांची सेना यांनी फिरून रूळ उखडले; वाटेतील लहान ओहळांवरील पूल काढून टाकले; कंपनीची गाडी मग जाणार कशी ? कंपनीचे लोक मग दातओठ खाऊ लागले व हात चोळीत बसले.

एक दिवस कंपनीचे टोळके आले; एक आले. दुसरे आले आणि तिसरेही. त्यांच्या हाती टिकाव होते. सत्याग्रह्यांची टाळकीच ठेचायचा त्यांचा बेत दिसला. सेनापतींनी बजावले—"खबरदार! आमच्यापैकी कुणाच्या केसाला धक्का लागला तर! गाठ माझ्याशी आहे. कंपनीच्या एका गुंडाला, हा पहा, मी हाती धरून ठेवलाय!"

सेनापतींचा आवेश बघून कंपनी बावरली, बावचळली. तिने सरकारकडे धाव घेतली. सेनापती, पैसाफंड रानडे, शेरेकर देवराव, पौडचे हिरवे यांच्यावर खटला झाला. २० ऑक्टोबर १९२१ ला शिक्षा सुनावल्या गेल्या. सेनापतींना सहा महिने कैद व शंभर रुपये दंड बसला. येरवड्याच्या बंदीखान्यात त्यांची रवानगी झाली. यशाची वाट मसणवटीतून जाते; याचा तो मासला ठरला. कारण २० जूनपासून कंपनीनेच पुणे-मुळशी रस्त्यावरचे रूळ काढून टाकले होते.

* *

## ३२. असा असतो गनिमी कावा!

सेनापती २२ एप्रिल १९२२ ला सुटले. पारनेरला गेले. आईवडिलांचा त्यांनी आशीर्वाद घेतला. तोच त्यांच्या हाती तार! सत्याग्रहाच्या प्रचंड मोहिमेची मुक्रर तारीख १ मे! सेनापती ताबडतोब छावणीत हजर!!

सरकारने सेनापतींचे सहाय्यक या ना त्या निमित्ताने तुरुंगात डांबले होते. जनता अन् सेनापती एवढीच सरकारच्या सामन्यास होती. जनतेला विश्वासात घेण्यासाठी सेनापतींनी मुळशी प्रश्नासंबंधी एक सविस्तर पत्रक काढले. लोकांना समजाविले. येत्या लढ्यात गोळीबारालाही तोंड द्यावे लागेल, अशी त्यांची खात्री होती. पत्रकाच्या शेवटी "सत्याहयुद्धात प्राणाहुति" असा मथळा होता. तेथे सरकारला आव्हान होते.

"गोळीबार करणे असल्यास सरकारने अगाऊ जाहीर करावे; गरीब, निष्पाप जनता फुकट मरू नये. सरकारी बंदुकीतील गोळ्या छातीवर झेलण्यास आम्ही तयार आहोत!"

नंतर सेनापतींनी ११ जून १९२२ ला मुंबईस मुळशी परिषद भरविली. सर्व मराठी भाषिकांचे प्रतिनिधी तेथे आले. डॉ. मुंजे—नागपूरचे—अध्यक्ष झाले. स्वागताध्यक्ष भारताचार्य चिंतामणराव वैद्य होते. मुळशी–मावळ्यापैकी जयाबाई भोईण हिने सभा गाजवली. ती म्हणाली—"आमी हाटनार न्हाई. मरनार पर जिमिन सोडणार न्हाई ॥" सेनापती म्हणाले—"शूर मावळ्यांनी शिवाजीला शिवाजीपण दिले. असली माणसे जिवंत राहिली तरच हिंदुस्थानात जिवंतपणा कायम राहील!" तीन वर्षांत तीन हजार माणसे तुरुंगात गेली तरी बेहेत्तर ॥ तीन लाख रुपये सत्याग्रहापायी गेले तरीसुद्धा फिकीर नाही अशा निश्चयाने परिषद रंगली.

आणि १ ता. २ सप्टेंबर (१९२२) ला सत्याग्रहयुद्ध सुरू व्हावयाचे ठरले! तोपर्यंत सेनापतींनी प्रचाराचा धूमधडाका उठविला. सेनापतींना गिरफदार करायला ब्रिटिश सरकार टिपून टपले होते; हे उघड दिसत होते. आग्र्याहून सुटलेल्या शिवरायाचे टिपण सरकारी हेर-खात्यास आठवले, "धरणाच्या जागेपासून दूर—वेल्होळी गावी नदी-पलीकडे—आंबवणे घाटातून सेनापती २ सप्टेंबरला येणार; लोकांनी स्वागतासाठी जमावे" अशा दवंड्या झाल्या. तेथे मंडपही उभारण्यात आला. सरकारी डोळे व हात तेथे सेनापतींना झडपण्यासाठी साहजिकच जमा झाले!!

सत्याग्रहाची तारीख २ सप्टेंबर; उगवली. सेनापती धरणाच्या जागी सत्याग्रहास सज्ज झाले. त्याआधीच पाठशिवणीचा सरकारी डाव फसला! बैलांच्या शिंगांना पलिते बांधून त्यांचें तांडे एका बाजूस पळवून

दुसऱ्याच मार्गाने निसटणाऱ्या शिवाजीने शाहिस्तेखानाला जो धडा दिला, त्याची आठवण नौकरशाहीला झाली. कार्थेजच्या हॅनिबॉलची कथा युरोपियनांना आठवली. पण करणार काय ?

सेनापतींचा सत्याग्रह सुरू झाला, चाळीस मावळ्यांसह त्यांना अटक होऊन सहा महिन्याची शिक्षा सुनवण्यात आली. आपल्या मागे बाहेरच्या लोकांत उत्साह कायम रहावा, म्हणून सेनापती तुरुंगात काव्ये करीत; ती नागपूर टिळक विद्यापीठाचे आचार्य माधवराव कानिटकर, नंदगडचे श्री. काळे, तिजारे असे सेनापतींचे सहबंदी पाठ करीत आणि ? बराकीबाहेर उघड्या रानात कामाला मंडळी आली की ते काव्यसंदेश लोकांपर्यंत अगदी लेखी येत! १९२२ च्या डिसेंबरपासून १९२३ फेब्रुवारीअखेर हे संदेशवाहन अव्याहत चालले. राष्ट्रीय शाळांतील विद्यार्थ्यांना दिलेल्या संदेशात सेनापती म्हणतात :

"चला सोडुनी की सर्वही पाठशाळा ।
चला शत्रुची बुद्धि लावू कसाला ॥"

* *

## ३३. बोम्ब-ठोक की बॉम्ब फेक ?

सेनापती तुरुंगात! तरी ठरल्याप्रमाणे मुळशीला सत्याग्रह चालूच ! मग कंपनीने खाशी युक्ती काढली! मावळ्यांचे वर्षाकाठी चार महिने सावकारांच्या कृपेवर निभायचे. त्या सावकारांना कंपनीने फितवले! पैसा पापाचा बाप ठरतो, तो असा! ज्या एकर जमिनीला शंभर रुपये पडायचे, तिला कंपनीने हजार रुपये देऊ केले! तो सोन्याचा सूळ सत्याग्रहाला सलला!!

एवढ्यात १९२३ च्या फेब्रुवारीत सेनापती येरवड्याबाहेर आले. सत्याग्रह-संग्रामात सकसपणा आणण्यासाठी ते प्रचाराला लागले.

सातारा जिल्हा करून ते बेळगावला गेले. तेथील भाषणात उफाळून बोलले! "आता बोम्ब ठोकण्याचे दिवस संपले! बॉम्ब फेकण्याचे दिवस आले आहेत!!"

अरे बापरे! नौकरशाहीच्या डोक्यावर सेनापतीच्या शब्दांचाच बॉम्ब पडला. सेनापतीवर खटला झाला. त्यांना एक वर्षाची शिक्षा झाली. आणि संपलाच की मुळशीचा सत्याग्रह!! कारण वर्षभर सेनापती नाहीत म्हणजे चैतन्यच नाही!!! पानपतच्या पराभवातूनही पुन्हा पुरुषार्थ उभारू पाहणारा रावसाहेब (थोरला माधवराव पेशवा) क्षय पावल्यावर, मराठेशाहीच मावळली नाही काय? तसेच झाले मुळशीचे!!

* *

## ३४. शुद्ध सत्याग्रहाची चुणूक

सेनापती १४ ऑक्टोबर १९२४ रोजी मोकळे झाले. त्या सत्वधीर पुरुषाला मग काय वाटले? टाटा कंपनीने मावळ्यांच्या जमिनी बुडविल्या; मुळशी पेटा आपल्या मालकीचा केला; पण माणुसकी म्हणून तरी मावळ्यांच्या जीवनाची हमी घेतली काय? जर नाही, तर आपल्या साम-सत्याग्रहाला शुद्ध-सत्याग्रह बनविण्याचे सेनापतींनी ठरविले. ७ नोव्हेंबर १९२४ पासून मुळशीतील ज्योतिरूपेश्वराच्या क्षेत्रात रहावयाचे व तिथल्या मावळ्यांची वस्ती उठताच श्री ज्योतिरूपेश्वराबरोबर जल-समाधी घ्यावयाची!! सेनापतींनी अस्सा संकल्प केला. हा संकल्प प्राणपणाने ते पार पाडणार! त्यांना नगरचे कुकडे, पुण्याचे बाभळे, मोंगलाईतले गोरे, असे असे तोलामोलाचे साथी मिळाले. चिंचवडचे धुंडिराज देव आणि इंदूरहून आलेले आत्मारामपंत मोडक (गुरुजी) ही मंडळी तर सेनापतींचे उजवे-डावे हातच.

पौड हे मुळशी पेट्यातील एक मोठ्यापैकी गाव. पुण्यापासून वीस मैलांवर. त्याला चाटूनच चिंचवडचा रेल्वेफाटा शेऱ्यावरून मुळशीला जातो. पौडला शुद्ध-सत्याग्रह करण्याचे सेनापतींनी ठरविले. मोंग्लाईतील गोरे यांनी तलवारी, जंबिये वगैरे आणविले. मोंगलाई-आंग्लाईच्या सरहद्दीवरून ते मोठ्या हिकमतीने आणावे लागले. मोडक, गोरे, बाभळे, कुकडे या चार शिलेदारांसह सेनापती ६ डिसेंबरला बैलगाडीतून पौडला गेले. ७ डिसेंबरला त्यांनी पहाणी केली. सत्याग्रहासाठी ९ तारखेच्या सकाळचा मुहूर्त ठरविला.

रेल्वे व टाटा यांच्याकडे तशा नोटिसा गेल्या. टाटा कंपनीची मुळशीकडे जाणारी गाडी अडविण्याचा कार्यक्रम करावयाचा होता. म्हणून रुळावर दगडाधोंड्यांची रास व्यवस्थेने रचण्यात आली. टाटा-गाडी येऊन थडकली. सेनापती होतेच उभे! हाती तलवार, पिस्तूल नि जंबियाने कमरबंद, अशा मोहऱ्यात ते होते. त्यांनी गाडी थांब-विण्याचा इशारा केला. ड्रायव्हरने त्यांचे का ऐकावे? गाडी दगडाच्या ढिगापर्यंत पुढे सरकलीच! सेनापती चेंगरलेच जावयाचे! पण थोड-क्यात बचावले. डब्यातून मजूर उतरले. ते कामाला लागले. सेनापतींनी आर्जव करूनही ते काम थांबवेनात. तेव्हा सेनापती शिलेदारांसह त्यांच्या अंगावर गेले.

मंददंड ही शुद्ध-सत्याग्रहाची चुणूक, तेवढीच त्यांनी दाखवली. मजुरांना किरकोळच जखमा झाल्या. इंजिन-ड्रायव्हर मार्टिन याच्या पायाला पिस्तुलातील गोळी चाटून गेली.

नेहमी पाया पडून सत्याग्रह करणारे सेनापती आणि मंडळी यांचा आजचा रुद्रावतार पाहूनच कंपनीच्या मजुरांच्या तोंडचे पाणी पळाले अन् हो काय? ते सैरावैरा पळत सुटले.

सेनापती आणि मंडळी ठरलेला कार्यक्रम संपताच पोलिसच्या स्वाधीन झाली. लगेच घोळका करून आलेल्या मजुरांना सेनापतींनी मुळशी-बाबतचा अन्याय समजावून सांगितला; साम व शुद्ध सत्याग्रहांची फोड करून दिली; आणि ? "पापात पडू नका" असा उपदेशही त्यांना केला.

सत्याग्रह्यांवर खटला होण्यास चुकला नाही. पण खुनाच्या इराद्याचा आरोप आपसूक गळला; परवानगीशिवाय हत्यारे बाळगण्या—वापरण्या-बद्दल आरोप राहिला. सेनापती न्यायमूर्तींना व ज्यूरीला उद्देशून म्हणाले—

"सत्याग्रहासंबंधी माझी नीती स्वतंत्र आहे. क्रमवारी व पूर्वसूचना यांना मी प्राधान्य देतो. सत्याची सेवा करणे हाच आमचा धर्म आहे. आम्ही सत्याग्रह केला तो सामसत्याग्रह होता. तरी कंपनीच्या लोकांनी सत्याग्रही स्त्रियांपुढे नागडा नाच केला व त्यांच्या छातीस हात घालून त्यांचा विनयभंग केला. सामसत्याग्रहात हात उचलायचा नाही, हे तत्त्व, म्हणून आम्ही कोणाचा मुडदा पाडला नाही. पिस्तुलाने ठार मारण्याची कला मी एडिंबरोला शिकलो आहे. माझ्या सत्याग्रहनीतीचा संदेश मला माझ्या राष्ट्राला कृतीने द्यावयाचा आहे. म्हणून अनेक रीतींनी मी मग शुद्ध सत्याग्रहाची समजी सरकारला व टाटा कंपनीला दिली. पौड येथे क्रमवारीच्या तत्त्वाप्रमाणे मंददंडच प्रतिपक्षियांना घडविला."

लक्ष्मणशास्त्री लेले वगैरेंची ज्यूरी होती. तिने "निर्दोषी" असा निर्णय एकमताने दिला. न्यायमूर्ती डनूलॉप यांना तो मान्य झाला नाही, उघडच, खटला मुंबईस फेरतपासणीस गेला. सेनापतींना तेथे निवेदन करूच दिले नाही. मग सेनापतींना सात वर्षे, देवांना आठ वर्षे, गोऱ्यांना

पाच वर्षे, बाभळे, कुकडे व मोडक यांना चार चार वर्षे सक्तमजुरी झाली.

सेनापतींची रवानगी सिंधला, देव व कुकडे यांची येरवड्याला, गोऱ्यांची विजापूरला व बाभळ्यांची साबरमतीला झाली !

एकाच तुरुंगात सगळ्यांना ठेवले अन् या भयंकर लोकांनी फिरून काही कट केला, तर "करा काय ?" अशी धागधूग सरकारला वाटत होती.

* *

## ३५. धर्मसंस्थापनार्थाय

शुद्ध सत्याग्रहाचा खटला चालू होता. तेव्हा सहा महिने येरवड्यास सेनापती कच्ची कैद भोगीत होते. येरवड्यास पूर्वी वर्तुळावर्तुळातून तुळशीवृंदावने व मारुतीच्या मूर्ती होत्या. कैदखान्याच्या अधिकाऱ्यांनी त्या सर्वांचे उच्चाटन केले होते. गुन्हेगार कैद्यांची देखील मने त्यामुळे दुखावली होती.

पण त्यांच्या भावनांना भीक कोण घालणार ? त्यांच्या अर्जविनंतीची दाद कशी लागायची ? सेनापती येरवड्यास येताच, त्यांनी त्या पांडुरंगाला आळवले. मग काय ? सेनापतींच्या डोक्यातला शंकर जागा झाला. पूर्वीसारखीं वृंदावने अन् मूर्ती जाग्यावर बसल्याशिवाय आपल्यावरील खटलाच आपण चालवून देणार नाही, असा सेनापतींनी शुद्ध सत्याग्रह पुकारला. तो यशस्वीच झाला. वृंदावने आपल्या जागांवर आली, मूर्तीही बैठक मारून बसल्या. मग सेनापतींचा खटलाही चालला अन् त्यांना सत्याग्रहाचा प्रसादही मिळाला.

* *

## ३८. निर्भेळ सत्यसेवा

सेनापती सिंध-हैदराबादच्या बंदीखान्यातून सुटले. तेव्हा गांधी-अर्विन करार झाला होता. महादजी शिंदे व हरिपंत-तात्या फडके यांच्या बरोबर इंग्रजांनी केलेल्या करारानंतर तसाच दीडशे वर्षांनी झालेला तो करार! स्वदेशी चळवळ ही तेव्हा तेजीत होती. विलायती कापडे सीलबंद होत होती. अशा वातावरणात सेनापती येताच महाराष्ट्र कोंग्रेस कमिटीचे अध्यक्षपद त्यांना देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

सोलापूरचा मार्शल लॉ आणि फर्ग्युसन कॉलेजमधील हॉट्सनवरील गोळीझाड झाल्यावरचे ते महाराष्ट्र कँाग्रेसचे अध्यक्षपद होते. विलायती कापडाचे उच्चाटन महाराष्ट्रातून करावे, म्हणून सेनापती कामाला लागले. पुणे, सातारा, नगर, सोलापूर, ठाणे, कुलाबा, रत्नागिरी या जिल्ह्यांतून त्यांचा प्रचार धडाक्याने झाला. याच सुमारास विलायतेंत दुसऱ्या गोलमेज परिषदेत महात्मा गांधी म्हणाले की—"जरूर तर माझ्या देशबांधवांच्या रक्ताची गंगा नदी भारतीय स्वातंत्र्यासाठी मी वहावयास लावीन."

आपल्या प्रचारात सेनापतींनी त्याचा उल्लेख केला. लगेच, हिंसा-अहिंसेची तात्त्विक भूमिका स्पष्ट करताना सेनापती म्हणाले—"महात्मा गांधींची भूमिका मला मान्यच आहे. पण देशबांधवांच्या रक्ताच्या गंगेशी कधी कधी शत्रूच्या रक्ताच्या यमुनेचा व देशद्रोह्यांच्या रक्ताच्या सरस्वतीचाही संगम व्हावा लागतो, असे प्राचीन तसाच अर्वाचीनही इतिहास सांगतो."

रत्नागिरीस सेनापतींचे असे भाषण होताच, ब्रिटिशांनी सेनापतींवर खटलाच भरला. सेनापतींचे वकीलपत्र घ्यावयास साताऱ्याचे निपुण

वकील दादासाहेब करंदीकर धावले. पण सेनापती म्हणाले—" न्याय-मूर्ते, करंदीकरांच्या कळवळ्याबद्दल मी कृतज्ञ आहे. पण मला वकील द्यावयाचा नाही. वकिलाशिवायच सत्य आपल्या तेजाने प्रभावी ठरले पाहिजे; ठरतही असते. कर्तव्य म्हणून मला स्पष्ट वाटले ते विधान मी निर्भयपणे केले आहे. त्यासाठी शिक्षा देणेच असेल, तर सुचेल ती शिक्षा आपण मला द्यावी."

थोडीथोडकी का? सात वर्षांची सजा फिरून सेनापतींना झाली ! ! ही सजा ओढवून घेताना "सत्यापरता नाही धर्म । सत्य तेचि परब्रह्म" अशीच सेनापतींची धारणा होती.

* *

## ३७. प्राणयज्ञदल

रत्नागिरी आणि हिंडलगा येथील बन्दीखाने. सेनापतींची ती निवास-स्थाने. सन १९३७ च्या जुलैअखेर ! त्या साली आठ प्रांतांत काँग्रेसची मंत्रिमंडळे आली. त्यांत मुंबईला खेर-मंत्रिमंडळ आले. त्याने सेनापतींची मुक्तता केली.

आता सेनापतींच्या डोक्यात भारत स्वातंत्र्याचे नवीनच चक्र सुरू झाले. १९३१ पासूनच ते आकार घेत होते. शील, धर्म, सत्य, सामर्थ्य ही राष्ट्रजीवनाची चतुःसूत्री. यांतील एकही कमी पडता कामा नये. परसत्तेचे सारे सामर्थ्य लष्करात. त्याच्यापुढे आपली शीलादी सूत्रे तोटकी पडतात. म्हणून परसत्तेचे लष्करी सामर्थ्य कसे पांगळे करावयाचे? शीलवंत सत्याग्रही धर्माचे प्राणयज्ञदल उभारून ! सेनापतींचा असा विचार.

ब्रिटिशांच्या भारतीय लष्करातील स्वकीय व परकीय सैनिकांचा न्यायासाठी हृदयपालट करावा; तो झाला की ते आपोआपच शस्त्र-

संन्यास करतील; तो घडवून आणण्यासाठी प्राणयज्ञदल. एक लक्ष भारतीय जवानांचे ते उभारावयाचे.

मतभेदांनी फाटलेला देश सांधून तो स्वतंत्र होण्यास तेवढाच उपाय सेनापतींना त्या वेळी दिसत होता. ते सांगतात—

"हजारोंचा तनुत्याग जुटाया देश हा हवा ।
हजारोंचा तनुत्याग सुटाया देश हा हवा ॥
जुटे कैसा, सुटे कैसा ? विलासी नीति जो वाढे. ।
जुटेना हा, सुटेना हा, न हो तत्प्रेम जो गाढे ॥"

प्रथम देशात जनतेचे ऐक्य करण्याचा रस्ता सेनापती आखू लागले. महात्मा गांधींची संमती त्यांनी वर्धा-आश्रमात जाऊन वाटाघाटीनंतर मिळवली. दीड वर्ष प्रचार करून दल उभारावयाचे. आराखडा आखताना सेनापतींनी एक पत्रक काढले. त्यात प्रगट केले की—"देशाकरिता शांतिमय प्राणयज्ञ करण्याचा देशसेवकाचा हक्क प्रस्थापित करणे हा या योजनेतील एक भाग आहे."

सेनापतींना साथ मिळू लागली. ता. २३ जुलै १९३९ ही प्राण-यज्ञाची तारीख सेनापतींनी नक्की केली. त्यांचा नूर आपण मागे राहून लोकांच्या जिवावर उठण्याचा कधीच नव्हता. पण सेनापतींसारखा मूर्तिमंत सेवायोग प्राणयज्ञ करून बसला, तर तरुणांना चैतन्य भरणार कोण ? "लाख मरोत, पण लाखांचा पोशिंदा न मरो" ही महाराष्ट्रातील ऐतिहासिक परंपरा होती. म्हणून विचारवंतांनी सेनापतींना ते मुळा-मुठेच्या संगमावर गेले असता जबरदस्तीने ओढून आणले. जनतेची ही महामहोपाध्यायगिरी सेनापतींनी चालू दिली. पण "लोक हा ओक धरिता धरवेना !" असे झालेल्या सेनापतींच्या तोंडून उद्गार निघत राहिले की, 'जिवंत बापट त्या दिवशीच मेला; आता फक्त कुडी आहे !'

स्वप्नातलाही शब्द खरा झालाच पाहिजे या व्रताच्या हरिश्चंद्र परंपरेची तळमळ होती हो, ती !!

* *

## ३८. "सेनापतींच्या उपरण्याची लाज धरा !"

सन १९३७ साली प्रांतिक स्वायत्तता आली. स्वराज्याचे झुंजु मुंजु झाले. पण ब्रिटिश रियासतीच्या अखत्यारीत संस्थानी रियासती त्याकडे ढुंकूनही पाहीनात. त्यात अग्रगण्य हैद्राबादचे निजामी सरकार. शासन जुल्मीं व अन्यायी तर बापट लढा उभारणारच ! तेव्हा १९३८ च्या सप्टेंबर मध्ये सेनापतीनी निजामाला निकराची हाक दिली—"जुलूम थांबवा व प्रजेला नागरीक हक्क द्या." निजाम कसला ऐकतो ? तेव्हा सेनापती आपल्या सहकाऱ्यांसह संस्थानात सत्याग्रह करायला गेले. तेथे त्यांना पकडण्यात येऊन निजामी हद्दीबाहेर आणून सोडण्यात आले.

सेनापती पुण्यास परतले. शनिवार वाडयापुढील मैदानावर जंगी सभा झाली. अध्यक्ष होते स्वातंत्र्यवीर सावरकर. अध्यक्ष म्हणाले,— "सेनापतीनी सत्याग्रहाच्या बाबतीत तो पुढाकार घेतला तो त्यांच्या पदवीस शोभेसाच आहे. जो धडाडीने पुढे जातो तो खरा सेनापती. मागे निजामाच्या दरबारात पेशव्यांच्या वकिलानी उपरणे टाकले आणि निजामाला दाती तृण धरून शरण आणले, तसेच सेनापती बापटांनी तेथे उपरणे टाकले आहे. तेव्हा सेनापतींच्या उपरण्याची लाज धरा."

सेनापती फिरून हैद्राबाद संस्थानात शिरले. परत त्यांना अटक करून ब्रिटीश हद्दीत सोडण्यात आले. सेनापतींची चिकाटी अशाने का बुळबुळीत होणार ! ते तिसऱ्यांदा सत्याग्रहास गेले. तेव्हा मात्र त्यांना गुलबर्गा येथे अटक होऊन चांगली दोन वर्षांची शिक्षा झाली. प्रत्यक्षात मात्र तीस दिवसातच सुटका झाली.

सेनापतींनी जसा हैद्राबाद संस्थांनी प्रजेसाठी लढा दिला तसाच १९४० च्या सुरुवातीला कोल्हापूर संस्थानच्या प्रजेसाठीही लढा दिला. यावेळी त्यांना पकडून एकदा कऱ्हाडला आणून सोडण्यात आले व दुसऱ्यांदा रत्नागिरीला नेऊन सोडण्यात आले.

सेनापती बापट अरेरावांच्या दरबारी आपले उपरणे असे टाकीत!

* *

## ३९. करावयाचे बोलू नये जबानीने!

देशगौरव सुभाषचंद्र बोस. १९३८ साली त्रिपुराचे अधिवेशन झाल्यावर त्यांनी कॅांग्रेस सोडली. फॉरवर्ड-ब्लॉक म्हणून स्वातंत्र्यासाठी निश्चित चाल करणारा एक पक्ष मग सुभाष बाबूंनी १९३९ साली काढला. त्याच्या महाराष्ट्रशाखेचे अध्यक्ष सेनापती बापट! ते बेळगाव धारवाड पर्यंत देशगौरवांबरोबर झंजावाती दौरा करून आले.

१९४० च्या ६ एप्रील रोजी जालीयनवाला बाग दिना निमित्त फॉर्वर्ड ब्लॉक तर्फे मुंबई चौपाटीवर सभा जाहीर करण्यात आली. सभा युद्ध विरोधी प्रचारासाठी होती. अध्यक्ष ठरले होते सेनापती बापट. ५ एप्रिललाच मुंबईला येत असता सेनापतींवर प्रवेश बंदीची नोटीस बजावण्यात आली होती.

मग काय? सगळा गुपचुपीचा कारभार! सेनापतीना कल्याणहून हर हिकमतीनी ६ तारखेस सभेस नेमके आणून दाखल करण्यात यावे असा डाव खेळण्यात आला.

सभा चौपाटीवर सहा वाजता सुरू व्हावयाच्या वेळी खळबळच! पोलीस बंदोबस्तही काटेकोरपणे कडक! माईक वरून सांगण्यात आले की, सेनापती बापट ठरल्याप्रमाणे खास येतील. तेव्हा तर पोलीस एकमेकांकडे आश्चर्यवत् पाहू लागले आणि समाजाची उत्सुकता शिगेला

पोहोचली. काही मिनिटातच एका घोळक्यातून "दिसे मूर्ति ही ठेंगणी बावळीशी!" येताना पाहून सेनापती आल्याची कुजबुज झाली. पोलिसांना कंवरा आवळता आवळता आपसात थोडे झाले! बहिर्जी नाइकासारखे सेनापती व्यासपीठावर धावत आले, त्यांनी माइकला हात घातला आणि आपले ओजस्वी वक्तृत्व फवारले. गांगरलेल्या पोलिसांनी लोकांवर लाठीमार केला, सेनापतींच्या हातचा माइक घेतला व शेवटी त्यांना पकडले, नव्हे ओढूनच काढले!! "आश्चर्यवत् पश्यति कश्चिदेनं! आश्चर्यवत् वदति तथै व चान्यः ॥" असा विराट पुरुष सेनापतींमध्ये लोकांना भासला.—सेनापती एक वर्ष शिक्षेवर गेले. ते नासिक तुरुंगात होते. आणि पुढे त्यांना स्थानबद्ध करण्यात आले. १९४१ शेवटी शेवटी त्यांची तब्येत खालावल्यामुळे त्यांची कारावासातून सुटका करण्यात आली.

या पूर्वीच एकदा देशगौरवांनी सेनापतींशी एकांती बातचीत केली होती. देशगौरवांनी म्हटले—"हिंदुस्थानच्या बाहेर पडावे; लष्कराची सिद्धी करावी; अन् द्यावी पिटाळून इथली परसत्ता! असे माझ्या मनाने घेतले आहे."

सेनापतीनी देशगौरवांना भर दिली. आणि? देशगौरव एक दिवस ब्रिटिश सरकारला हात चोळीत स ावयास लावून, त्या सरकारच्या कडक बंदोबस्तातून निसटलेही! आग्र्याहून सुटका घडवून गेलेल्या शिवाजीबद्दल औरंगजेब जितका खवळला असेल तितकी ब्रिटिश सरकारची त्रेधा–तिरपीट झाली. त्याने साप म्हणून दोरी धोपटायला सुरुवात केली. सरकारला वास लागला, की सेनापतीच देशगौरवांचे हिरोजी फर्जंद आहेत!! कारण पहिल्या महायुद्धाच्या वेळी म्हणजे कैसरी कंदन (१९१४–१९१८) सुरू झाल्यावर विष्णुपंत पिंगळ्यांनी पंजाबातील भारतीय सैनिकांना "देशाशी इमान राखण्याबद्दल" नव्हते का वळवले?

त्याचीच पुढली पायरी सुभाषचंद्र चढत होते. दुसऱ्या महायुद्धाच्या म्हणजे हिटलरी होरपळीच्या (१९३९–४५) काळात. पंचवीस वर्षांत भारतीय स्वातंत्र्यप्रेमाने केलेली ती प्रगती होती. तिची परंपरा १८५७ पासूनची नव्हती काय? म्हणून "करावयाचे बोलू नये जबानीने।" हे समर्थ व्रत सेनापतींनी स्वीकारले होते.

त्या व्रताचे दुसरे प्रत्यंतर सेनापतींनी दिले. महात्मा गांधींनी सेनापतींना १९४४ साली बोलवून घेतले होते. साम-सत्याग्रह, शुद्ध-सत्याग्रह, सशस्त्र क्रांती अशी काही चर्चा झाली. सेनापती महात्माजींना म्हणाले—"तुम्ही आपल्या शांतीच्या मार्गाने चाला. स्वातंत्र्यासाठी साधनानामनेकता असते. क्रांतिकारकांना त्यांच्या मार्गे जाऊ द्या."

सेनापतींचा सल्ला महात्माजींनी मानला. ३० जून १९४४ रोजी महाराष्ट्र काँग्रेसजनांपुढे महात्माजींनी स्पष्टच सांगितले की—"९ ऑगस्ट १९४२ रोजी 'चले जाव'च्या ठरावाने स्पष्टच केले आहे की, भले नेते गिरफदार झाले तर प्रत्येक भारतीय हा स्वतःचा नेता आहे. संपूर्ण स्वातंत्र्याच्या सूर्याशिवाय भारतातील अंधार संपणार नाही. म्हणून कोणीही तो स्वातंत्र्यसूर्य उगवण्यासाठी काहीही केले, तरी मी त्याच्याबद्दल काही म्हणणार नाही."

* *

## ४०. स्वातंत्र्याचे स्वागत

भारताचे स्वातंत्र्य साकार व्हावे म्हणून १९४४ च्या मध्यापासूनच महात्माजींनी राष्ट्रीय लढा सुरू करावा, म्हणून सेनापती धडपडले. बॅ. जिनांशी संगनमत साधून ब्रिटिश राजवट येथून उधळून लावावी म्हणूनही सेनापतींनी महात्माजींना व काँग्रेसला सूचना केल्या. पण

त्यातले काहीच घडले नाही. शेवटी १५ ऑगस्टला (१९४७) भारत स्वतंत्र व्हावयाचे ठरले. त्या "दिवसासाठी" मुंबईच्या नॅशनल स्टँडर्ड या पत्राला संदेश देताना सेनापतींनी हृदयाविष्कार केला तो असा :—

"१५ ऑगस्ट हा एक भला दिवस आहे; कारण तो बहोत-कल्याणकारी ठरेल. त्यातही काही बाधा होतील हे खरे! पण कल्याणांनी आनंदणाऱ्या आणि बाधांनी अश्रू गाळणाऱ्या अशा उभयता देशबांधवांशी मी समरस आहे. मात्र उभयतांनी एकमेकांच्या भावनांची आदब राखावी. आपल्याला वासाहतिक स्वराज्य मिळत आहे; आपले पुढारी मनावर घेतील तर त्याचे संपूर्ण स्वातंत्र्यही होईल. ज्यांनी प्रत्यक्षाप्रत्यक्ष हा मोका यावा म्हणून हातभार लावला त्या सर्वांविषयी आपण मनोमन कृतज्ञ राहू या. ब्रिटिश मजूरपक्षाचे आपण आभार मानू; आणि हिटलर-चेही. त्याने जर दुसऱ्या महायुद्धात सारखा घण चालवून ब्रिटिशांची प्रस्तुतप्रमाणे दामटी वळवली नसती, तर आपल्या मानेवरील गुलामगिरीचे बोजड जू, स्वतःच्याच प्रतिष्ठेसाठी का होईना, काढून घेण्याची बुद्धी ब्रिटिशांना झाली नसती!

आपण आपल्या पुढाऱ्यांनाही माफीत काढू या. त्यांनी 'सामर्थ्य नेटे चळवळीचे' दाखविले असते, तर खंडित होण्यापासून देश बचावला असता. निदान, खंडित भारत स्वीकारावयाचाच होता तर तो उदारपणे प्रथमच स्वीकारला असता, हिंदु-मुसलमानांत जो कडवटपणा निर्माण केला, त्यापासून तरी देश बचावला असता!

पण गेले ते गंगेला मिळाले! आता तरी आपल्या दुःखपूर्ण चुकां-पासून धडा घेऊन योग्य तो नेट आणि दूरदृष्टी ते परिस्थितीसापेक्ष दाखवतील अशी आपण अपेक्षा करू.

एकजिनसी गुलाम हिंदुस्थानऐवजी पाकिस्तान, भारत आणि अनेकानेक संस्थाने आता झाली! मी पाकिस्तानचे, संस्थानांचे आणि

भारताचे भले चिंतितो. गुलाम हिंदुस्थानात मी चुकूनसुद्धा नव्हतो, इतका स्वतंत्र भारतात मी आज आनंदात आहे. फिरून अखंड हिंदुस्थान होईलही; अगर–कदाचित आजचीच घडी पुढे चालेल! हिंदुस्थानचे स्वतंत्रही घटक मनावर घेतील आणि स्वातंत्र्याची अमूल्यता ओळखून एकमेकांशी व्यवहार करतील, तर खंडित होण्याने झालेल्या वेदना विसरूनही सर्वांच्या प्रयत्नांची दिशा लाखो गरिबांच्या कल्याणनिर्मिती-वर केंद्रित होईल व त्यांचा नि आपला भविष्यकाळ आजच्यापेक्षा उज्ज्वल ठरेल.

आपल्या स्वातंत्र्यसंग्रामात ज्यांनी ज्यांनी आपला घाम गाळला, रक्त सांडले, जीवाची कुर्बानी केली, त्या पहिल्या उठावापासूनच्या आपल्या देशबांधवांना आणि देशभगिनींना या आपल्या स्वातंत्र्य दिनी कृतज्ञतेने कोटी कोटी प्रणिपात."

* *

### ४१. आत्मयज्ञदलाची कल्पना

जगावे तर समाजासाठी आणि मरावे तरी समाजासाठी, ही सेनापतींची धारणा." अभयं सत्वसंशुद्धिर्ज्ञानयोग व्यवस्थितिः।" या गीतावचनाचे प्रतीकच ते. त्यामुळे इंग्लंडात दोन वेळा, येरवडा तुरुंगात एकदा, सिंध- हैदराबादच्या तुरुंगात दोनदा, आणि रत्नागिरीस तीनदा आणि मुळशी-सत्याग्रहात दोनदा, असे दहा प्रसंग सेनापतींनी जीवाच्या करारावर उभारले. "माझे मागणे दे वा मरण दे" असे त्यांनी श्रीहरीला मागितले नि श्रीहरीने त्यांची मागणीच पुरी केली.

पण १९४८ साली विचित्र परिस्थिती उठली. महात्मा गांधींच्या दिल्लीस ३० जानेवारी रोजी झालेल्या हत्येमुळे, महाराष्ट्रातही हीन हिंसाचार होऊ लागले. त्यांना आळा बसावा, नाही तर ते माणुसकीला

बट्टा लागणारे हिंसाचार बघत बसण्यापेक्षा आपण इहलोक सोडावा म्हणून वयाच्या अडुसष्टाव्या वर्षी सेनापतींनी अन्नसत्याग्रह करून प्राण पणाला लावावयाचे ते अहमदनगरच्या गांधी मैदानावर आणि ईश्वराची-श्रीहरीची-मर्जीच असेल तर स्थलसमाधी घ्यावयाची, असे सेनापतींच्या मनाने घेतले.

"हीन हिंसा दीन व्हाया । अहिंसा व्हावया बली ॥
स्वहोम भारती देवा । तळपू दे रे स्थली स्थली ॥"

त्यासाठी आत्मयज्ञदलाची कल्पना त्यांनी समाजाच्या पुढे ठेवली. महात्मा गांधी जानेवारी (१९४८) च्या शेवटच्या शुक्रवारी दिवंगत झाले, म्हणून दर महिन्याच्या शेवटच्या शुक्रवारी "अहिंसाप्रस्थापनार्थ" दहा अहिंसाभक्तांनी अहमदनगर, पुणे, मुंबई अशा ठिकाणी एकाच वेळी स्थलसमाधीस बसावे व जनतेबरोबर प्रार्थना करावी. स्थलसमाधी घेतल्यानंतर चोवीस तासांनी समाधिस्थानाचा दहनविधी व्हावा! अशी ती योजना!

स्वातंत्र्य मिळाल्यावेळेपूर्वीपासून देश हिंसाचारांनी पेटलाच होता! नोखालीत भडकलेले जातीय दंगे शमविण्यासाठी महात्माजीच नव्हते का गेले? गांधीहत्त्येनंतर तोच हिंसाचाराचा डोंब घरातच उठला. म्हणून जब्बर रोगाला जब्बर औषध लोकांचे लोकानी कसे करावे, ते सेनापतींनी सुचविले. पण सेनापतींची झेप सेनापतींपुरतीच!

"ज्याची त्याला पदवी । इतरा न साजे ॥

* *

## ४२. "एकच देईन धका । केला निर्धार निका ॥"

भारत स्वतंत्र झाला. इंग्रजांनी भारत सोडला तसा पाँडिचरीसारखा आपला सुभाही फ्रेंचांनी मुक्त केला. पण पोर्तुगीज "गोवा" सोडीनात.

१४९८ त वॉस्को-ड-गामा आला तेव्हापासून त्यांची वहिवाट होती ना ? ती मिरासदारी का सोडायची ? असा त्यांचा हट्ट होता. तेव्हा पंडित नेहरूंनी आपले आंतरराष्ट्रीय वजन पणाला लावले. पण साला-झार हा पोर्तुगालचा शासक अक्षरशः "साला झार !" ठरू लागला आणि तो नेहरूंच्या व बड्या राष्ट्रांच्या शब्दाला मुळीच भीक घालीना ! उलट, लष्करी बंदोबस्त कडक करून तो युद्धाची खाई पेटवण्याची तयारी दाखवू लागला.

भारतीय जनताही गोवा-विमोचनाच्या, शांतिसत्याग्रहाचे आराखडे आखून, हालचाली करू लागली. सेनापतींनी शांतियज्ञाची कल्पना पंतप्रधान पं. नेहरूंना व जनतेला सुचविली. शुद्ध बलिदानासाठी दोन हजार भारतीयांनी स्वयंस्फूर्त पुढे यावे, अशी हाक पंडित नेहरूंनी द्यावी. "आम्हांला आंतरराष्ट्रीय प्रश्न शांततेने सोडवले जावे असे तीव्रतेने वाटते. म्हणून गोव्याचा अंशतः आंतरराष्ट्रीय प्रश्न शांततेने सोडवला जावा अशी जगाला प्रार्थना करून आम्ही जग सोडीत आहो" अशी प्रार्थना-घोषणा स्वयंस्फूर्त गोवा-विमोचनेच्छूंनी करावयाची आणि पिस्तुलाची गोळी स्वतःच्या हाताने स्वतः मारून घ्यावयाची ! दिल्लीत दर महिन्याच्या पहिल्या तारखेस शंभर शांतिसैनिकांनी हे व्रत आचरावयाचे. त्यांना दिल्लीपर्यंतचा भाडे वगैरेचा सर्व खर्च आणि पिस्तुले भारत सरकारने पुरवावयाची ! आत्मयज्ञ झाल्यावर शांतिसैनिकांच्या देहांची व्यवस्थाही भारत सरकारने लावावयाची ! ! ! अशी ती सेनापतींची थोडक्यात आखणी होती.

सत्याग्रहानेही सामनेवाल्याला थोडा त्रास होतो; तोही न देऊ इच्छिणाऱ्या भारतसरकारला व शांतिसत्याग्रह्यांना सेनापतींचे हे आवाहन आणि आव्हान होते. हे दिव्य म्हणजे स्वतःच्या बलिदानाने जगातली

माणुसकी जागी करण्याचा यज्ञ होता. तो करावयास प्रल्हादाची निष्ठाच हवी होती.

सेनापतींची योजना १९५५ च्या ऑक्टोबरपासून साकार व्हावी, असे वेळापत्रक ठरले असते. भारतीय जनतेला एवढा दम होता कोठे? गोवा-विमोचन-समिती स्थापन होऊन गोव्यात चहूबाजूंनी शांति-सत्याग्रह करण्याची मोहीम सुद्धा लोकांनी मुक्रर केली. झाशीवाली लक्ष्मीची इषीम घेऊन सौ. सुधाबाई जोशी गोव्यात घुसल्या तर साथी नानासाहेब गोरे वगैरे तरुण मंडळी तानाजी–बाजी प्रभूच्या जिद्दीने आपापल्या स्वयंसेवकांच्या दलांनिशी गोव्यात चाल करून गेले. नुसते महाराष्ट्रीयच नव्हे, तर पंजाबी, बंगाली सुद्धा सर्व भारतीय त्या मागे सरसावले आणि सालाझारच्या लष्करशाहीला नामोहरम करण्याच्या मार्गाला लागले.

सेनापती या वेळी पाऊणशे वर्षांचे होते. सालाझारशाहीला तोंड देण्याचा मामला धकाधकीचा, तो त्यांच्या अशक्तीला कसा सोसवणार? म्हणून सेनापतींना व त्यांच्यासारख्या वृद्धांना आशीर्वाद देण्यास मागे ठेवले होते. पण लढाईला तानाजी निघाल्यावर शेलार मामा घरी बसेल तरी का? त्या वेळी तो वय विसरतो. "वृद्धोऽपि तरुणायते।" तसेच झाले सेनापती बापटांचे!

साथी नारायणराव गोरे गोव्याकडे गेले. ते आपल्या तुकडीला ता. १८ मे रोजी गोव्यात कसे शिरावयाचे आणि पोर्तुगीज-सत्ताकेंद्रापर्यंत कसा ठाव घ्यायचा, याचे मार्गदर्शन करणार! इतक्यात सेनापती बापट त्यांच्या-समोर हजर–!! नानासाहेबांनी विचारले, "कशाला आपण या धुम-श्चक्रीत आलात? आम्हांला आपल्यासारखी देवमाणसे पाठीवर थाप मारावयास हवीत ना!"

"तेवढ्यासाठी तर आलो!" सेनापती उत्तरले. तुम्हा तरुणांबरोबर काही तेज दाखवू दे की आम्हांला ? का आम्ही आपले दगडासारखे देव म्हणून बसायचे अन् अंथरुणात खितपून देवाघरी जायचे? महाराष्ट्राच्या अस्मितेला हे मंजूरच नाही!!"

मग कोणी झाले तरी काय बोलणार ? गोवा-सीमाभागात सेनापतींनी प्रवेश केला. पोर्तुगीज पोलिसांनी त्यांना अटक केली आणि रीतसर सगळे सोहाळे होऊन ते भारतात परतले.

* *

## ४३. निराशा शूराच्या कधिहि चित्ता न शिवते!

स्वराज्य येऊन वर्ष लोटण्याच्या आतच भाषावार प्रांतरचनेच्या योजना सुरू झाल्या. सामान्य माणसालाही दैनंदिन राज्यकारभार व देशधोरणे मायभाषेतून समजावीत व सामान्य माणसांच्या गरजा नि विवेकी सूचना शासकांच्या कानी सहज पोहोचाव्यात म्हणून भाषावार प्रांतरचना काँग्रेसने १९१७ पासून डोळ्यांपुढे धरली होती. १९२२ साली भाषावार प्रांतिक पद्धतीनेच काँग्रेसचे चळवळीसुद्धा सर्व कामकाज चालू झाले. स्वराज्यात मग राज्यकारभारासाठी भाषावार प्रांतरचनेची भूक साहजिकच तीव्र झाली. संस्थानी रियासती आड यावयाच्या तर त्याही १९४८ साली जवळजवळ संपल्याच! तेव्हा मराठी भाषिकांचा एकजिनसी महाराष्ट्र स्थापन व्हावा, अशी मागणी लोक करू लागले. पण भारतात सर्वत्र भाषावार प्रांतरचना झाल्या तरी "महाराष्ट्र आधार या भारताचा," तो गुजरातशी हातमिळवणी करून ठेवण्यात आला. सेनापती रागावले, महाराष्ट्र उसळला अन् गुजरातही चवताळला. कोणी झाला तरी अन्याय का म्हणून सहन करावा ?

चार वर्षे द्विभाषिकाचा अनुभव चाखूनही लोकांना न्याय मिळेना. तेव्हा संयुक्त महाराष्ट्र स्थापना-समिती तर्फे निर्वाणीचे उपाय योजावयाचे ठरले ! १९५६ मध्ये मुंबईस संयुक्त महाराष्ट्रासाठी १८ नोव्हेंबर रोजी प्रचंड मोर्चा काढून मुंबई सचिवालयाजवळ निकराने सत्याग्रह करण्याचे ठरले. त्या मोर्चाचे नेतृत्व सेनापतींनी पतकरले. मोर्चा नेटाने व नेटके-पणाने फ्लोराफाउंटनपाशी गेला. तेथे सरकारी पोलिसांनी त्यांचा कोंड-मारा केला. सेनापतींना लाठ्यांचा प्रसाद मिळाला; कित्येकांना अश्रुधूर कासावीस करून बसला, आणि ? तेवढ्यानेही मोर्चा आवरत नाही, म्हटल्यावर जो गोळीबार झाला, त्यात "शंभरावर नरबळी" झाले ! ! ! स्वराज्यातील हा अमानुष अनुभव ! ! ही काय लोकशाहीची कदर ? माणुसकीचे हे मातेरे पाहून सेनापती बेचैन झाले. पण श्रीहरी महाराष्ट्राची कसोटी पहात असावा, असे सेनापतींना वाटत होते. "यज्ञावाचुनि सिद्धी कैची । मान्यता नव्हे की फुकाची ॥" अन् तसेच झाले. १९५७ साली गुजरातेतही नरयज्ञाची पाळी आली ! ! तेव्हा शासन शहाणे झाले नि गुजरात व नागपूर-वऱ्हाडसुद्धा महाराष्ट्र स्वतंत्र प्रांत म्हणून १ मे १९६० पासून अस्तित्वात आले ! !

तरीही महाराष्ट्रावर सीमा-प्रदेशासंबंधात अन्याय झालाच ! डांग गुजरातला मिळाला अन् बेळगाव-कारवार कर्नाटकात जखडले. बेळगाव-कारवारांनी महाराष्ट्रात सामील होण्याबद्दल सव्वा तपाच्यावर सर्व सनद-शीर चळवळी केल्या. पण "दिल्ली तो बहोत दूर है ।" असाच त्यांना अनुभव आला. तेव्हा १९६६ साली मे महिन्यात मुंबईच्या मुख्य मंत्र्यांचा दाराशी आमरणांत उपोषणाचे धरणे धरले पुंडलीकजी कातगडे, सुंठणकर-प्रभृती बेळगावकरानी. सेनापती त्यांना साथ द्यावयास त्यांच्यातच उपोषणाचे ठाण मांडून बसले. तेव्हा दिल्ली हलली. पंतप्रधान

इंदिरा गांधी मुंबईस आल्या. त्यांनी सेनापतींना अन्याय दूर करण्याचे आश्वासन दिले व उपोषण सोडण्याची विनंती केली.

स्वराज्यशासनाच्या प्रमुखांची विनंती सेनापतींनी न्यायच मिळेल या आशेने मानली. पण अन्याय दूर झालेला पाहण्यास सेनापतींस मिळाला नाही !! कारण पंतप्रधानांनी नेमलेल्या महाजन-समितीचा उपाय अपायच ठरला !! तरीही बेळगाव-कारवारवरचा अन्याय दूर केल्याशिवाय राहणार नाही, असा सेनापतींचा निश्चय होता.

* *

## ४४. क्रांतिकारकांचे भीष्मांचार्य

सेनापती बापट हे क्रांतिकारकांचे भीष्माचार्य. त्यांचे देशसमर्पित जीवन. तेही अखंड कर्मयोगाचे. १२ नोव्हेंबर १९६७ ला त्यांच्या जीवनाला ८७ वर्षे पूर्ण झाली. त्या दिवशी "सेनापती बापट समग्र वाङ्मयाचा तिसरा खंड" प्रसिद्ध होऊन सेनापतींची "वाङ्मयीन पूजा" साजरी झाली. तरी बेळगाव महाराष्ट्रात सामील करण्यासाठी प्राणांतिक उपोषणाचे ठाण मांडण्याचा निदिध्यास सेनापतींनी घेतलाच होता.

आपल्या पावन श्रीहरीच्या आंतरिक आदेशाची ते प्रतीक्षा करीत होते. तशातच शनिवार ता. २५ नोव्हेंबरला पहाटेस आपल्याच चिरंजिवाच्या येथे नित्याप्रमाणे शरीरशुद्धीसाठी स्नानगृहात शिरत असता पडले !! थकलेले ते शरीर कोसळताच, सेनापतींच्या मांडीचे हाड मोडले. मग कोण स्वस्थ बसणार ? निष्णात डॉक्टरांकडून सेनापतींना औषधोपचार सुरू झाले. पण सेनापतींच्या हाड-मोडीवर शस्त्रक्रिया आवश्यक ठरली.

सोमवारी ती व्हावयाची ठरली. पण माणसाने काही मनात आणावे अन् निसर्गाने निराळेच योजावे, असा अनुभव आला. त्या दिवशी सेनापतींना हृदयविकाराचा झटका आला. मग शस्त्रक्रिया सहजच लांबणीवर टाकण्यात आली. अन् सेनापती? श्रीहरीच्या चिंतनातच निमग्न होते.

रात्रौ त्या चिंतनातच असताना सेनापतींनी "एकादशी लागली ना?" अशी चौकशी केली. हरिदिनी लागल्याचे समजल्यावर ते श्रीहरीच्या चिंतनात आणखी निमग्न झाले. त्या तंद्रीतच मग ते रात्रौ १२ वाजून ४० मिनिटांनी आपल्या श्रीहरिचरणी लीन—विलीन झाले!!

हरिदिनीला बापट जन्मले, हरिदिनीला श्रीहरिचरणी विलीन झाले. न्यायासाठी आणि तत्त्वासाठी झगडण्यात जीवन समर्पित करणारा महाराष्ट्राचा सेवायोगी तपस्वी आणि भारताचा स्वातंत्र्यप्रेमी क्रांतिकारक अनंतात मिळाला!!!

त्या संत सेनापतीला कृतज्ञतेच्या अश्रूंनी अनंग अभिषेक करीत आणि भावपूर्ण श्रद्धांजली वहात वहात जनतेने मग, त्यांच्याच इच्छे-प्रमाणे त्यांचा देह अग्निनारायणाच्या स्वाधीन केला. पूज्य साने गुरुजींच्या दहनभूमीचेच ते महात्म्य होते. दादर चौपाटीकडील डॉ. आंबेडकरांच्या स्मारकासमोरील त्या निर्वाणभूमीला आणि संत सेनापतींच्या स्मृति-जीवनाला अभिवादन करून लोक परतले. सेनापती बापट अमर रहे।

* *

## ४५. संत सेनापती

पांडुरंग महादेव बापट. भारत-स्वातंत्र्यासाठी क्रांतिकारक लढवय्ये

झाले त्यांत अग्रेसर भारतीय संस्कृतीचे गाढे व्यासंगी. दीनदुबळ्यांची सेवा हीच ईश्वरसेवा मानणारे संत.

लहानपणी गरिबीतून शिकले. डेक्कन कॉलेजातून बी. ए. झाल्यावर विलायतला इंजिनेर होण्यासाठी गेले. पण लोकमान्य टिळक, विनायकराव सावरकर व श्यामजी कृष्णवर्मा यांच्या प्रेरणेने क्रांतिकारक बनले. बॉम्बची विद्या घेऊन १९०८ साली हिंदुस्थानात परत आले.

माणिकतोळा बॉम्बकेस बंगाल्यात झाली. तीत गोस्वामीने बॉम्बचे प्रचारक बापट म्हणून सांगितले. तेव्हा बापट वनवासी राम झाले. १९१४ साली त्या भगभगीतून ते सुटले. चित्रमय जगत्, मराठा, ज्ञानकोश यांत कामास लागले. १९२१ साली टाटा कंपनीने मुळशी पेट्यात धरण बांधून हजारो मावळे अन्नाला मोताद होण्याची पाळी आणली. तेव्हा बापटांनी सत्याग्रह आरंभला. लोकांनी त्यांना त्या चळवळीचे पुढारी ऊर्फ सेनापती केले. त्यापायी त्यांना सात वर्षे बंदीत काढावी लागली. सुटून आल्यावर १९३१ साली महाराष्ट्र काँग्रेसचे ते अध्यक्ष झाले. दौऱ्यात रत्नागिरी येथे सेनापती बापटांनी विधान केले की—स्वराज्यासाठी आम्ही आपल्या रक्ताची गंगा वाहवू; वेळ पडली तर शत्रूच्या रक्ताची यमुना आणि देश-द्रोह्यांच्या रक्ताची सरस्वती वाहवून; नवे प्रयागतीर्थ उभारू! झाले!! लगेच ब्रिटिश सरकारने त्यांना सात वर्षांची शिक्षा देऊन कराचीचा तुरुंग दाखवला.

सन १९३७ साली काँग्रेसची राजवट आली आणि सेनापती बापट सुटले. त्यांना देशाचे स्वातंत्र्य हवे होते. ते लवकर यावे म्हणून त्यांनी आत्मबलिदान करणारांचे दल उभारण्याचे काढले. २३ जुलै १९४४ ही तारीखही नक्की केली. पण लोकगंगेपुढे त्यांनी ती कल्पना सोडून दिली. याच १९३७ व १९४४ सालांत महात्माजींनी सेनापतींना

भेटीस बोलावून वाटाघाटी केल्या. "आपण शांतिक्रांतीच्या मार्गे जा आणि जे शस्त्रक्रांतीच्या मार्गे जात असतील त्यांना त्यांचा मार्ग चोखाळू द्या." असा सल्ला सेनापतींनी दिला. दरम्यान १९४० साली देशगौरव सुभाषचंद्र बोस यांनी हिंदुस्थानबरोबर आझाद सैन्य उभारण्याची आपली कल्पना सांगून सेनापतींचा आशीर्वाद घेतला होता. आणि परिणामतः "चलो दिल्ली!" या देशगौरवांच्या हाकेला "परसत्ते चले जाव!" अशी घोषणा करून देशाने साथ दिली होती. त्यामुळे १९४७ च्या १५ ऑगस्टला स्वातंत्र्यसूर्याचे नवकिरण भारतावर वर्षले.

सन १९४८ पासून संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सुरू झाली. १९५६ च्या १८ नोव्हेंबरला मुंबईत त्यासाठी शासन-समजावणीसाठी मोर्चा निघाला. त्यात सेनापतींनी आघाडी लढविली व लाठीमारही केला. त्यानंतर १ मे १९६० रोजी स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. तरीही बेळगाव-कारवार महाराष्ट्रात समाविष्ट होण्यासाठी १९६६ साली मुख्यमंत्र्यांच्या निवासासमोर उपोषण करणारांत सेनापती सहानुभूतीने सहकारी झालेच.

मध्यंतरी १९५५ साली गोवामुक्ती सत्याग्रहातही शेलारमामाच्या ईर्षेने सेनापतींनी भाग घेतला होताच.

महाराष्ट्राचा हा निःस्वार्थी महापुरुष आणि भारताचा थोर क्रांतिकारक "सेनापती बापट" या नावाने ओळखला जात असला तरी त्याची खरी ओळख "संत सेनापती" या शब्दानेच होते. "बरे तरी देऊ अंगीची लंगोटी। नाठाळाचे माथी घालू काठी॥" असे बजावणारी धारदार जीवन गंगा म्हणजेच संत-सेनापती. यांना १२ नोव्हेंबर १९६७ रोजी सत्त्याऐंशी वर्षे पूर्ण झाली. त्यांचे समग्र वाङ्मय त्या दिवशी प्रसिद्धही झाले. "मयाद्ययावत् लिखित यत् तत् तुभ्यं समर्पये।

तत् हि मे निखिलं वित्तं न वित्तं भौतिकं मम ॥ " असे आपल्या मंगला या नातीस सांगणारे सेनापती महाराष्ट्रीय व भारतीय तरुणांस आपल्या यज्ञमय जीवनातील क्रांतिस्फूर्तीचा वारसा ठेवून २८ नोव्हेंबर १९६७ रोजी एकादशीस कृतकीर्तीच्या आत्मानंदाने अनंतात विलीन झाले.

* *

# थोडक्यात सेनापती

१. आपणास पटलेल्या तत्त्वासाठी झगडणारा विद्वान
२. गरीब आणि दुःखितांच्या मुक्तीसाठी झगडणारा क्रांतिकारक.
३. तरुणांची तेजस्वी प्रेरणा.
४. शुद्ध चारित्र्याचा मानवतावादी.
५. गुलामगिरी व अन्याय यांच्याशी लढा देणारा सरळ मनाचा, निरहंकारी, सोशिक, अध्यात्मनिष्ठ; बुद्धिमान सेवायोगी.
६. श्रीहरीचा पाईक; संतांची समता, क्रांतीची आच, समर्थ—प्रतिभा यांचा समन्वय.

## सेनापतींचे ग्रंथ

Divine Life चे भाषान्तर.

Holy Song

गीताहृदय

इंग्रजी, संस्कृत, हिंदी व मराठी या चार भाषांत विपुल, प्रेरक व सात्त्विक असे गद्य व पद्य सेनापतींनी लिहिले आहे.

* *

# संत-सेनापतींचे अमृत-बोल

१. महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेले । मराठ्याविना राष्ट्रगाडा न चाले ॥
खरा वीर वैरी पराधीनतेचा । महाराष्ट्र आधार या भारताचा ॥

२. माझ्या दृष्टीने निधर्मी राज्य चांगले. निधर्मी म्हणजे मानववादी.

३. देशाचा संसार, माझे अंगावरी
ऐसे थोडे तरी वाटू द्या हो !
वाटू द्या हो थोडेतरी प्रत्येकासी
माझी कासाविसी याचसाठी ॥

४. नको भ्रांतिचा भारती कारभार ।

५. करी ज्यांचिया पूर्ण सरकार सत्ता ।
नुरे त्यात जैं न्याय नी नीतिमत्ता ॥
तईं बोलणे काम न देई न काही ।
तईं संगरावीण आधार नाही ॥ १ ॥

६. लढावे, चढावे, चढावे, पडावे ।
पडावे तरीही चढाया लढावे ॥ १ ॥

७. निजस्वार्थ, कौटुंबिक स्वार्थ टाकू ।
समाजार्थ, राष्ट्रार्थ कार्यात कां-कूं ॥

कधीही करू ना, तरी दैन्य ह्याकू ।
न वाकू कुणाही पुढे, मान राखू ॥ १ ॥

८. शील प्राणाहुनी मोठे, प्राण शीलाहुनी उणा ।
हा सिद्धांत असे मान्य, सर्वसामान्य सज्जना ॥ १ ॥

९. आईवरी विपत्ति, आम्ही मुले कशाला ।
आईस सोडवाया, येणार कोण? बोला ॥

१०. सार संसाराचे पर-उपकार ।
त्याविण असार सर्व काही ॥ १ ॥
उपकारी वेचा तनमनधन ।
मोक्षासि साधन दुजे नाही ॥ २ ॥

११. माझा हिंदुस्थान, माझी सर्व घरे ।
हे मज ईश्वरे, शिकविले ॥ १ ॥

१२. या संसाराच्या चक्रात प्रत्येक जीव दोष करीत करीतच निर्दोष होत असतो.

* *

# मुलांस बोध

मुलांनो, उद्याचे तुम्ही थोर लोक, करा आपुले आजचे काम चोख;
दिले लक्ष नाही बरे आज ज्याने स्वकार्यी, तया दुःख हे निश्चयाने ॥ १ ॥
असे दुःख संसारि नानापरीचे परी त्यात जे का स्वतःच्या चुकीचे
खरे तेच अत्यंत अत्यंत जाची, म्हणूनी स्वकर्तव्य-सेवा सुखाची ॥ २ ॥

शरीर व्यायामे सुदृढ बनवावे अनुदिन, ।
करावे अभ्यासे सुपथ अनुवर्ती निजमन ।
कला विद्या काही समयउचिता प्राप्त करुनी ।
स्वदेशोद्धाराचे व्रत उचलणे धर्म म्हणुनी ॥ ३ ॥

नसे सत्ता आम्हासि या स्वदेशी नसे सत्तेविण मान जगि कुणासी ।
म्हणूनी देशाते प्राप्त होय सत्ता असे करणे हा मुख्य धर्म आता ॥ ४ ॥

धैर्य, चिकाटी, हट्ट सोडणे स्वार्थावरती पाणी ।
देहावरती उदार होणे स्वराज्य व्हावे त्यांनी । ५ ॥
हीच एक पात्रतानिशाणी विश्वा संमत झाली ।
म्हणुनि हीच आम्ही दाखविणे जरूर सांप्रतकाली ॥ ६ ॥

असे यापरी गोष्ट ही भारताची म्हणूनी तुम्हा सांगणी काळजीची ।
शिका सर्व काही, परि धैर्य आदी गुणांची पुरी जोड साधाच आधी ॥॥

# सेनापतींच्या जीवनाची तालिका

१८८० ता. १२ नोव्हेंबर रोजी जन्म पारनेर (अहमदनगर) येथे.
१८९२ पारनेर येथील प्राथमिक शिक्षण समाप्त.
१८९७ पुण्यास न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षण.
१८९८ (१) विवाह, (२) मॅट्रिक परीक्षेत जगन्नाथ शंकर शेठ स्कॉलरशिप.
१९०२ पुणे डेक्कन कॉलेजात समशेरीवर हात मारून देशसेवेची शपथ.
१९०४ विलायतेस शिक्षणासाठी रवाना.
१९०८ भारतात परत. माणिकतोळा बॉम्ब-केसमध्ये बापटांचा उल्लेख.
१९१३ अखेर अज्ञातवासात.
१९१४ गावसफाईस सुरुवात.
१९१५ चित्रमय जगत, मराठा, ज्ञानकोश, होमरूल.
१९१७ लेनिन-क्रांतीचे 'स्वागत'.
१९२१ ते १९३७ कारागृहपर्व मुळशी सत्याग्रहाने सुरू.
१९३१ महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष.
१९३९ प्राणयज्ञदल.
१९४५ हरिजनांना मंदिर-प्रवेश हवा म्हणून दौरा.
१९४८ संयुक्त महाराष्ट्र चळवळ.
१९५५ गोमंतक मुक्तिसंग्राम व संयुक्त महाराष्ट्र मोर्चा.
१९६६ मुख्यमंत्र्यांच्या निवासासमोर महाराष्ट्र सीमाप्रश्नी उपोषण.
१९६७ ता. २८ नोव्हेंबर—निर्वाण.